

कृपापदावली

भाग : २

।। श्री ।।

* कृपापदावली *

भाग : २

(पदभूमिकांसह)

(भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे , नव्या आरत्या,
नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी)

❐

डॉ. सुहास पेठे
एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* कृपापदावली : भाग २

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑक्टोबर २०१२
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

हा ईश्वरी कृपाप्रसाद
सकल संतचरणी
आणि
साधकांच्या चरणी
कृतज्ञतापूर्वक समर्पण ...

- सुहास पेठे

पार्श्वभूमी

श्रींच्या कृपेने साकारलेल्या 'पदावली' ची ही स्वतंत्र आवृत्ती साधकांच्या सेवेत सादर करताना आनंद होतो. 'साधनपदावली'च्या सातव्या आवृत्तीनंतर मध्यंतरी 'साधनसांगाती' या नावाने संतछायेतील समग्र उपासना विस्तृत स्वरूपात उपलब्ध झाली होती. ती आता येथील नित्योपासनेपुरती राहणार असल्याने व त्याची सुधारित आवृत्ती, त्यात सातत्याने पडत असलेली भर लक्षात घेता, सतत प्रसिद्ध करणे अवघड आहे. त्यामुळे ती भर शक्यतो येथील आवृत्तीत हाती घालण्यात येत आहे. मात्र परगावच्या तसेच येथीलही साधकांच्या घरच्या उपासनेसाठी 'साधनपदावली' व 'कृपापदावली' यांची वाढती गरज लक्षात घेऊन, आता 'साधनपदावली'ची आठवी आवृत्ती पहिला भाग म्हणून प्रसिद्ध होत आहे. तसेच 'कृपापदावली'चाही आता खूप विस्तार झाल्यामुळे 'कृपापदावली'चा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. या दोनही पदावलींचे पुढील भाग अनुकूलतेनुसार प्रसिद्ध होत आहेत.

पदांच्या निवडीमागील विचार पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आला असून कोणता विशिष्ट संप्रदाय, कर्ता, मत अशा गोष्टींना प्राधान्य दिले जात नसून भाव, भक्ती, विचार, करुणा, तळमळ, मार्ग, सावधानता इत्यादी गोष्टी प्रधान धरल्या आहेत. त्यामुळे सर्व पंथांतील किंवा वेळी कुठल्या पंथाशी बांधील नसलेल्या पण जिज्ञासू व्यक्तींनाही या दोन्ही पदावलींचा व त्यांतील प्रार्थना, अभंग, पदे, आरत्या, श्लोक,

नवनव्या उपासनामाला, नवे नित्यपाठ – यांचा यापुढेही पूर्वीप्रमाणेच उपयोग होईल, अशी आशा आहे.

त्यामुळे साधनेचा मार्ग, विचार स्पष्ट होईल, प्रपंचात व परमार्थातही अत्यंत गरजेची असलेली सावधानता बाळगता येईल, खाचखळगे कळून येतील, टाळता येतील, दिशाभूल वाचेल, अवडंबर –कर्मठपणा कमी होईल, आपापला पंथ– साधन– गुरू–नाम यांच्याविषयी भाव वाढेल पण त्यांतली आग्रही भूमिका कमी होईल, इतर साधने – संप्रदाय यांविषयी आदरभाव निर्माण होईल, तसेच स्वतःच्या गुरूंविषयी, उपास्याविषयी भाव स्वच्छ, निश्चित व शुद्ध होईल, अशी पदे घेण्याचा प्रयत्न केला आहे. तो साधकांना उपयोगी ठरावा, ही इच्छा.

यापूर्वीच्या आवृत्त्यांमध्ये तसेच साधनसांगातीमध्येही फक्त मूळ पदे, पदकर्ते व अनुक्रमणिका एवढ्याचाच समावेश केला होता.परंतु त्यानंतर त्या पदांच्या येथे म्हणण्यात असलेल्या चाली जिज्ञासूंपर्यंत पोचाव्या यासाठी, २००२ मध्ये प्रथम साधनपदावलीच्या अकरा कॅसेट्स् व कृपापदावलीच्या पाच कॅसेट्स् आणि नंतर सीडीज्, पुढे डीव्हीडीज् काळानुसार प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यावेळी या पदांना पदभूमिकाही देण्यात आल्या होत्या. त्या भूमिका संक्षिप्त असल्या तरी, पदांचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा साधकांना अतिशय उपयोग होत असतो. म्हणून पदावलीची पुढील आवृत्ती प्रसिद्ध करताना या भूमिकांचा समावेश या पदांबरोबर

करण्यात यावा अशी अनेकांची सूचना होती. ते या आवृत्तीपासून शक्य होत आहे, याचाही आनंद होतो. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार कठीण शब्दांचा अर्थही त्या त्या ठिकाणी देण्याचा प्रयत्न केला आहे .

पदावलीच्या या निरंतर प्रकल्पाला अनेकांचा हातभार लागत आला आहे. मूळ सोळा कॅसेट्सचे रेकॉर्डिंग अत्यंत आपुलकीने व सेवाभावाने करणाऱ्या सौ. राधिका हंगेकर, श्री. हंगेकरसाहेब व त्यांचे चिरंजीव यांना तसेच, घरी पुढील रेकॉर्डिंग, एडिटिंग तसेच या भागांचे प्रकाशन, वितरण यांना हातभार लावणाऱ्या सर्व लहानथोर साधकमंडळींना धन्यवाद द्यावे, तेवढे थोडेच आहेत.

या दोन्ही पदावलींतील पदांना अनुकूल अशा चाली सुचणे ही केवळ संतकृपाच होय. त्यांचे गायन, हार्मोनियम साथ करण्यासाठी प्रतिकूल शारीरिक अवस्थेत इतकी वर्षे मला मिळालेली प्रकृतीची अनुकूलता तसेच पत्नी सौ. सुखदा हिचे प्रोत्साहन व सहकार्य हाही याच कृपेचा भाग होय. तसेच इतकी वर्षे जवळपास अडीचशे पदांना तबल्याची समजूतदार साथ रा.रा. नंदन तर, झांजेची साथ श्री. मंगेश मंत्री करीत आले आहेत. हा ईश्वरी प्रसाद प्रेमळ साधकांपर्यंत पोचवण्यात त्यांचा असलेला सहभाग व सेवाभाव यांची मी ऋणज्ञतेने नोंद घेतो.

ही आवृत्ती प्रसिद्ध करण्यापूर्वी नुकतीच २१२ ट्रॅक्सची ऑडिओडीव्हीडी क्र.७ प्रकाशित झाली आहे. ती ती पदे त्यातून ऐकण्यास सुलभ जावी म्हणून,

पदाच्या शेवटी त्या त्या पदाचा ट्रॅक नंबर दिला आहे. अधिक सोयीसाठी श्रींच्या कृपेने साधनपदावलीची व कृपापदावलीची ऑडिओ सीडी पदावलीच्या भागानुसार लवकरच उपलब्ध करण्याचा विचार आहे. येथील पदांची मांडणी डीव्हीडी क्र.७ मधील क्रमाने केली असून विशिष्ट पद चटकन मिळावे म्हणून अनुक्रमणिका मात्र अकारविल्हे देण्यात आली आहे.

या दोन्ही पदावलींतील पदांच्या निरंतर अभ्यासाने, अर्थाच्या मनन चिंतनाने, ती पदे अर्थ लक्षात घेऊन मनापासून म्हणण्याने – आपले अंतरंग शांत होवो, उजळून निघो, ते परमार्थाला उत्तरोत्तर अधिक अनुकूल होवो – अशी श्री गोंदवलेकर महाराजांना व सर्व संतसत्पुरुषांना प्रार्थना करून, या पदावलींची सेवा त्यांच्या चरणी अर्पण करीत आहे.

संतछाया,
सातारा. **- सुहास पेठे**

□

कृपापदावली भाग : २

अनुक्रम

विभाग : १ - कृपापदे

येथे समाविष्ट केलेल्या सर्व पदे व अभंगांची वर्णानुक्रमणिका

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१.	अंधारुन हे किती येउ दे	..३५..
२.	अवघी इच्छा ही अनिवार	..३७..
३.	कठीण रे बाबा कठीण	..१९..
४.	काय 'माझे' आहे शोधुनिया पाहे	..२१..
५.	कळो आले कोण करितसे राखण	..१७..
६.	खंत वाटे देवा आम्ही झालो भूमिभार	..२५..
७.	गुरुची कृपा कधी कळेल	..१५..
८.	गुरुचे झालो दास	..१३..
९.	देव शोधिता शोधिता	..४१..
१०.	संतांचिया पायी ठेवा	..५१..
११.	पाहता नयनांसी विश्राम	..२९..
१२.	ब्रह्मचैतन्यांचा आधार	..३९..
१३.	माझ्या देवाने मला फसविले	..४९..
१४.	मना नाम घे, मना नाम घे	..२७..

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१५.	महाराजांची शाळा	..४७..
१६.	शक्तिबुद्धिधनधीरबळे कुणि	..३३..
१७.	सदा संतछाया देई देवराया	..४३..
१८.	सावध व्हा रे सावध व्हा	..३१..
१९.	हाती माझे काय देवा	..२३..
२०.	हरिस्मरणाची, हरिकरुणेची	..४५..

*

विभाग : २ - नित्यपाठ		पृष्ठ क्रमांक
१.	विनवणीची वाणी	..५४..
२.	सृष्टिसंदेश (सृष्टिसंदेशमधील अभंगांच्या भूमिका आणि सृष्टीची आरती यांसह)	..६०..

*

विभाग : ३ - उपासनामाला पृष्ठ क्रमांक

१. ऋणस्मरणमाला ..८७..

*

विभाग : ४ - सममंत्र

१. श्री गणेशपूजन मंत्र आणि सममंत्र ..८९..

*

विभाग : ५ -मानसपूजा

१. श्री सद्गुरूंची मानसपूजा (भूमिकेसह) ..१०७..
२. श्रींची एकश्लोकी मानसपूजा ..११०..
३. सर्वांसाठी सोपी पर्यायी मानसपूजा ..११०..

*

* * *

* १. कृपापदे *

भूमिका

या पदमालिकेत सादर होणारी पदं म्हणजे श्री सद्गुरू गोंदवलेकर महाराज आणि सर्व संत-सत्पुरुषांची व्यक्त झालेली कृपाच होय. या अर्थानं ती कृपापदं आहेत. ती पदं लिहिताना कविता नाहीत किंवा म्हणताना गाणं नाहीत. तर, भगवंताकडच्या साधनप्रवासातली ती पदं म्हणजे पावलं आहेत. त्या अर्थानं ती साधनपदंही आहेत. या प्रवासातल्या विविध अवस्था आणि अनुभव त्यातून व्यक्त होतात. त्यामुळंच ही पदं रचताना किंवा गाताना काव्यशास्त्रापेक्षा भावाला, अनुभवाला आणि साधकवृत्तीला पूर्ण प्राधान्य देणारी आहेत. म्हणून ही कृपापदं साधकवृत्तीनं पहावीत, ऐकावीत आणि वापरावीत, अशी विनयपूर्ण प्रार्थना आहे. अन्य पदं कृपापदावलीच्या पुढील भागांतून दिली जात आहेत.

माणूस कितीही सामान्य जरी झाला तरीही, तो कुणाची गुलामी किंवा कुणाचं दास्यत्व सहसा करत नाही. कुणाला ते आवडतही नाही. त्यातून केलंच तर, ते काही मतलब साध्य करण्यासाठी असतं किंवा नाइलाजापोटी असतं. इतकं नको वाटत असतानासुद्धा देहसुखाच्या आशेनं माणूस किती दास्यत्व नकळत करतो, हे पाहिलं तर आश्चर्य वाटेल. सुखापोटी तो विकारांचा दास होतो. मोठेपणापायी, प्रतिष्ठेपायी, भीतीपायी, सत्तेपायी तो माणसं, गणगोत, पैसा – अशा इतक्या गोष्टींचा दास बनून जगतो की, ते कळणारही नाही. पण इतकी दास्यत्व पत्करूनसुद्धा तो सुखी व्हावा तर ते दूरच. अनेकदा त्याच्या पदरात सुखाऐवजी अपेक्षाभंग, निराशा, दुःख हीच पदरात पडतात, असं आढळतं. हा सारा अनुभव या पदात मांडला आहे. अनिच्छेनं पत्करलेल्या इतक्या दास्यत्वांचा अनुभव पहाता, आता खरं कोणाचं दास्यत्व करायला हवं होतं, त्याचा बोध झाल्याचं स्पष्ट केलं आहे आणि हे दास्यत्व मात्र आपण स्वेच्छेनं आणि आनंदानं पत्करायला तयार झाल्याचा अनुभव या पदात मांडला आहे. भगवंत आणि तो गाठून देणारे सद्‌गुरू यांचं दास्यत्व आनंदानं पत्करल्यानं, आता मात्र इतका काळ दुर्लभ बनलेला आनंदी आनंद आयुष्यात पसरल्याचा अनुभव इथं दिला आहे. तो साधकांना अंतर्मुख करील आणि मार्गही दाखवील.

..१..

आम्ही गुरुचे झालो दास, आनंदे रे ।।धृ।।

विकारांचे दास्य केले
सुखाशेने कष्ट केले
मृगजळी तृषा शमणार, कशी रे ? ।।१।।

माणसांचे दास्य केले
गणगोत वाढविले
अपूर्णाचे पूर्ण होणार, कसे रे ? ।।२।।

जगालाही दास केले
वित्त विद्या सत्ता झाले
क्षणिकांचे सुख टिकणार, कसे रे ? ।।३।।

देव गुरू जोडियेला
दीन म्हणे बोध झाला
आनंदी आनंद टिकणार, आता रे ! ।।४।।

(ट्रॅक नं. १२३)

माणसाचा प्रपंचव्यवहार अखंड चालू आहे. त्यात त्याच्यावर अनेक आपत्ती, प्रसंग अखंड येत असतात. तो त्यांना तोंड द्यायचा प्रयत्नही करतो. पण अनेकदा त्याचं बळ अपुरं पडून, तो भगवंताला किंवा गुरूंना प्रार्थना करतो. ते त्याला प्रसंगात सांभाळतात. पण त्याला हे अनेकदा कळतही नाही की, त्याला सांभाळणारे गुरू हे अनेकदा संकटं येण्याआधीसुद्धा ती टाळून त्याला सांभाळतच असतात.

इतकंच काय, त्याची देहबुद्धी, घर–दार, मुलं–माणसं सर्व गोष्टी यांतसुद्धा गुरूंची कृपा असते. या साऱ्यांत पुन्हा त्याच्या जीवनाला कल्याणाची दिशा ते देतात. हे सारे त्यांचे उपकार आपल्याला कधी आणि कसे कळतील, असा प्रश्न तळमळीनं या पदात विचारला आहे आणि शेवटी हेही विचारलं आहे की, कधी हे कळलं किंवा लक्षात आलं तर, ते आकलन पुढं टिकेल का ?

..२..

गुरुची कृपा कधी कळेल, मजला कृपा कशी कळेल
किती, कुठे सांभाळितो कळेल, गुरुची कृपा कधी कळेल ? ।।धृ।।

अभिमान मज देहाचा, थाट पहा माझ्या बुद्धीचा
दिली कोणी कसे कळेल, गुरुची कृपा कधी कळेल ?।।१।।

घरदार माझे पाही, मिळकतीचा हेवा होई
कोणी सारे दिले कळेल, गुरुची कृपा कधी कळेल ? ।।२।।

पती पत्नी मुले बाळे, मित्र गोत्र सारे सोहळे
कोण टिकवितो कळेल, गुरुची कृपा कधी कळेल ? ।।३।।

येण्याआधी विघ्ने निवारी, सावरितो आल्यावरी
मज हे कधी कळेल, गुरुची कृपा कधी कळेल ? ।।४।।

उद्धाराची चिंता वाही, कल्याणाची दिशा देई
कोण माझ्यासाठी कळेल, गुरुची कृपा कधी कळेल ?।।५।।

दीन म्हणे गुरुराया, तूचि होशी छत्रछाया
कळले, हे कसे टिकेल, गुरुची कृपा कधी कळेल ? ।।६।।

(ट्रॅक नं. १२४)

प्रत्येकाच्या जीवनात गुरूंचं एक अपरिहार्य स्थान असतं. काहींना ते कळतं, काहींना अखेरपर्यंत ते कळतही नाही, इतकंच. अनेक ठिकाणी आपल्याकडून कोणताही लाभ होत नसताना आपल्यासाठी राबणारे लोक भेटतात. आपल्या रक्षणासाठी धडपडणारे लोक असतात. आपलं ओझं हलकं करणारे लोक भेटतात. या साऱ्यांच्या मागं एक सूत्रधार असतो. तो म्हणजे आपले सद्‌गुरू होत. ते आपली इतक्या प्रकारे सर्वत्र राखण करतात, काळजी घेतात. त्यातही पुन्हा वेळोवेळी आपल्याकडून घडणाऱ्या चुकांचं प्रायश्चित्त आपण स्वतः होऊन न घेतल्यानं आपलं नुकसान होईल, हे ते जाणतात आणि आपल्याकडून पश्चात्ताप घडवून घेऊन, त्या त्या पापापासून आपल्याला तेच मुक्त करतात. इतकंच काय, आपली कोणती पुण्याई किंवा साधना नसताना आपल्यावर ते कृपा करतात. या पदामध्ये व्यक्त झालेला सद्‌गुरूंच्याविषयीचा हा सारा भाव मनोज्ञ आहे आणि आपल्याला अंतर्मुख करणाराही आहे.

..३..

कळो आले कोण करीतसे राखण ।
लाभावीण शीण कोण करी ।।१।।

कोण करी मज साह्य वेळेवरी ।
कोण ओझे शिरी घेई माझे ।।२।।

घेई माझे पाप करवी अनुताप ।
वर पुण्याचे माप पदरी घाली ।।३।।

पदरी घाली सुख समाधान सकळ ।
मज खळासी प्रेमळ कोण होय ।।४।।

कोण होय प्रसन्न न करिता साधन ।
चुकता रडता कोण पोटी धरी ।।५।।

पोटी धरी सद्‌गुरू तोचि सूत्रधार ।
न पडो आता विसर , दीन म्हणे ।।६।।

(ट्रॅक नं. १२५)

आपला प्रापंचिक माणसांचा अनुभव असा आहे की, घर बांधणं, लग्न करणं, प्रपंच करणं, शिक्षणं, नोकरी–धंदा, पैसा–लौकिक कमावणं – यांसारख्या गोष्टी कठीण असतात. खूप कष्ट करूनसुद्धा अनेकांना त्या साधत नाहीत. परमार्थातसुद्धा संत भेटणं, पारमार्थिक ग्रंथ समजणं, ते समजावून देणं – अशा काही गोष्टी दुर्लभ आणि कठीण मानल्या जातात. पण या पदामध्ये असा एक वेगळा अनुभव मांडलेला आहे की, या साऱ्या गोष्टी एकवेळ सोप्याच आहेत पण, खरा परमार्थ अंमलात आणण्याच्या गोष्टी मात्र महाकठीण आहेत. कारण त्यात स्वतःवर प्रयोग आहे. आपली वृत्ती बदलण्याचा प्रश्न आहे. त्यातही स्वतःच्या प्रपंचात पाहुण्यासारखं रहाणं किंवा कशात न गुंतणं किंवा परमार्थात गुरूंवरची श्रद्धा टिकवणं, नाम घेणं, काहीही असो. कशाहीबद्दल बोलणं सोपं आहे, पण करणं मात्र महाकठीण आहे. आपल्या साऱ्या साधनेला हे सगळं लागूच आहे.

..४..

कठीण रे बाबा कठीण । कठीण रे बाबा कठीण ।
कठीण कठीण कठीण । कठीण रे बाबा कठीण ।।धृ।।

बि-हाड बदलणे सोपे आणिक घरे बांधणे सोपे
मजल्यावरती मजले वेळी तेही उठवणे सोपे..पण
आपल्या घरात आपण असून, पाहुण्यासारखे राहणे.. ।।१।।

शिक्षण अर्थार्जन सोपे अन् लग्न प्रपंचही सोपे
समाजकार्ये युद्धे वेळी शोध पराक्रम सोपे..पण
सारे काही करणे, त्यात, कुठे न गुंतुन राहणे.. ।।२।।

संत गाठणे सोपे त्यांचे ग्रंथ समजणे सोपे
उपदेशाचा अर्थ लावणे विवरण करणे सोपे..पण
श्रद्धा टिकून राहणे, संत सांगतात तसे वागणे.. ।।३।।

नाम किती हे सोपे आणिक स्मरण किती हे सोपे
कसले कठीण वाटे तुम्हा क्षुल्लक सारे सोपे..पण
दीन म्हणे रे बोलणे सोपे, करणाऱ्याला कठीण.. ।।४।।

(ट्रॅक नं. १२६)

माणसाला सोसाव्या लागणाऱ्या दुःख आणि अशांततेचं सर्वांत मोठं कारण बरेचदा माणसाचं 'मी' आणि 'माझेपण' असतं, हे विचार केल्यावर पटतं. माझा देह, माझी भूमी, माझा प्राण, माझं जग – अशा ज्या अनेक गोष्टी मला माझ्या वाटतात, त्या साऱ्या गोष्टींचा खरा विचार या पदाच्या निमित्तानं होतो आहे.

विचार केल्यावर असं लक्षात येतं की, या नेहमी माझ्या वाटणाऱ्या मूळ गोष्टीसुद्धा मी निर्माण केलेल्या नाहीत, मी नियंत्रित करू शकत नाही. त्या माझ्याशिवाय अस्तित्वात येतात, असतात किंवा नष्टही होतात. ही सावधानता मला आली तर, जीवनातल्या कितीतरी चिंता आणि दुःख कमी होतात. त्यातही जे माझं वाटतं, ते सारं भगवंताचं आहे, ही जाणीव ठेवून मी जगू शकलो तर, उलट कृतज्ञता, शांती आणि आनंद यांनी जीवन भरून जातं, असा अनुभव येतो.

..५..

काय 'माझे' आहे शोधुनिया पाहे
बेसावध साहे दु:ख जगी ! ।।धृ।।

उभा भूमीवरी सोय जन्मभरी
एक कण तरी निर्मिली का ? ।।१।।

सांभाळितो प्राणा सृष्टीतील वारा
काय प्राण खरा माझा होय ? ।।२।।

जरी वाटे माझ्या देह मालकीचा
येई तोच त्याचा राही जाई ! ।।३।।

जग–जीव सारे मावळे उजाडे
कुठेही न अडे माझ्याविना ! ।।४।।

'नाही माझे काही' हा शब्द , उच्चार
तो पाही उधार ठरेचि ना ? ।।५।।

'माझे माझे' सारे देई दु:ख , चिंता
'तुझे'म्हणता त्यांची वार्ता कोठे ? ।।६।।

सावध जीवन, कर्तव्य, आचार
शांतीचे माहेर चित्त करी ! ।।७।।

सोनियाचे दिन देव किती देई
कृतज्ञ तू राही दीन म्हणे ! ।।८।।

(ट्रॅक नं. १२७)

सर्वसामान्यांपासून थोर, प्रसिद्ध पुरुषांपर्यंत सर्वांचाच स्वतःच्या कर्तृत्वावर मोठा विश्वास असतो. त्यामुळं स्वतःच्या 'मी'चं गाणं प्रत्येकजण मोठ्या अहमहमिकेनं आयुष्यभर गात असतो. पण खरं पहाता, वस्तुस्थिती तशी नसते. उलट ती वेगळीच असते, हे या पदामध्ये स्पष्ट केलेलं आहे. ज्याच्या साहाय्यानं माणूस कर्मं किंवा कर्तृत्व करतो, तो देह, ते मन, ती बुद्धी – यांतलं काहीच त्याच्या हातात नसतं. सृष्टीतल्या दगड–गोट्यांपासून साऱ्या चैतन्यमय वस्तूंपर्यंत कशावरही त्याची निर्णायक सत्ता चालत नाही. असं असतानाही 'माणूस' मी हे केलं आणि ते करीन, अशा वल्गना करतो. साधनेच्या दृष्टीनं हा 'मी मी' चा डंका थांबून, खऱ्या कर्त्याचा म्हणजे भगवंताचा शोध घेणं, खरं किती आवश्यक आहे आणि आपण ते करू का ? असं या पदात शेवटी मोठ्या तळमळीनं विचारलेलं आहे.

..६..

हाती माझे काय देवा कधी उमजेल ?
मी मी मी मी पिटतो डंका कधी हा थांबेल ? ।।धृ।।
ज्या देहाने करितो कर्मे
तो न माझे हाती
मी न जन्मा घातला तो
नाश करी नियती
पराधीन पायावरती इमला का टिकेल ? ।।१।।
मनबुद्धी असूनीया
दोन्ही हाती नाही
जुमानीना चराचर
लोकी सत्ता नाही
न करिता 'मी केले' हे कधी का घडेल ? ।।२।।
मी केले , मी करितो आहे ,
पुढे करणार
मिरवितो आजन्म मी
लोकी सांगणार
दीन म्हणे खरा कर्ता कधी आकळेल ? ।।३।।

(ट्रॅक नं. १२९)

साधकाच्या आयुष्यात अशी एक अवस्था येते की, त्याला दैववशात म्हणा किंवा त्याच्या भाग्यामुळं म्हणा सत्पुरुष भेटतात. ते त्याच्या कल्याणाचा मार्ग दाखवतात. तो चालण्यासाठी त्याला पेलेल, असं साधन देतात. त्याला सदैव सावध करून भानावर आणतात. तरीही, आपली प्रपंचाची ओढ काही शमत नाही. वारंवार हे सारं ऐकून, कळूनसुद्धा पुन्हा काहीच न कळल्यासारखं, अडाण्यासारखं काळ ढकलणं, साधनेला सबबी सांगणं, पुन्हापुन्हा बेसावधपणे प्रपंचात अडकणं – हे सारं सुरूच रहातं. पण याचीही स्वतः साधकालाच जाणीवसुद्धा होते. कारण सत्पुरुषांच्या संपर्कामुळं भगवंताची आणि परमार्थाची भूक जागृत झालेली असते. ती पुरी करायला नामासारख्या सोप्या साधनाच्या रूपानं अन्न दिलेलं असतं आणि ते अन्न खायला म्हणजे साधन करायला हात, म्हणजे लक्षणेनं नरदेहही दिला असतो. म्हणून साधना न घडल्याची खंत वाटते. साधना घडत नाही याचं कारण म्हणजे, ते करावं अशी जी इच्छा किंवा अशी जी बुद्धी, ती पुरेशी दृढ नसते. म्हणून ही खंत या पदात तळमळीच्या शब्दांत व्यक्त होऊन शेवटी सद्गुरूंना, संतांना आणि भगवंताला विनवणी केली आहे की, ही कमी पडणारी दृढबुद्धी आता आम्हाला द्या आणि या भवसागरातून पार करून भगवंताचा पैलतीर आम्हाला गाठून द्या. साधना घडत नाही, अशी खंत ज्यांना मनापासून वाटते, अशा साधकांनी मनोमन म्हणावी अशीच प्रार्थना या पदात आहे.

..७..

खंत वाटे देवा आम्ही झालो भूमिभार ।
पदोपदी शिकूनिया अज्ञ राहणार ! ।।धृ।।

घडो घडी काळ जातो
पुन्हा संधी कोण देतो
सारे काही कळले तरी, वेळ दवडणार ! ।।१।।

क्षणो क्षणी सावध केले
जागे करुनी बोधविले
तरी नाही भानावरी, जगी रमणार ! ।।२।।

साधन आम्हा हाती दिले
देवा किती सोपे केले
किती काळ सबबी वरुनी, साधन चुकविणार ? ।।३।।

भूक दिली, अन्न दिले
खाण्यासाठी हात दिले
दृढ बुद्धी दीना देऊनी, न्या हो पैलपार ! ।।४।।

(ट्रॅक नं. १३०)

मन हा परमार्थातला मोठा कूट पण अपरिहार्य प्रश्न आहे. मनाचे कल, स्वभाव सारं लक्षात घेऊनच सुज्ञ साधकानं परमार्थ करू पाहावं. मनाच्या या गूढपणातलाच एक प्रकार म्हणजे, मनाच्या ओढी. त्या इतक्या विलक्षण आहेत की, एकदा मनानं त्या गोष्टी करायचं ठरवलं की, कितीही कष्ट पडले तरी, त्याला चालतात. ते सारे कष्ट मन सोसतं आणि त्या त्या गोष्टी साध्य करतंच. अशा वेळी या पदात इथं एक मार्ग चोखाळला आहे की, मनानं ज्या ज्या गोष्टींची म्हणून समाधानासाठी ओढ घेतली, त्या त्या गोष्टी करून त्याला काय मिळालं, हे त्याचं त्यालाच हुडकायला सांगितलं आहे आणि मनाची मनालाच उमज पडल्यावर आता तरी तू बोध घे आणि संतांनी सांगितलेल्या नामाच्या मार्गानं जा, असं त्याला वारंवार बजावलं आहे. उद्देश हा की, त्याला या पार्श्वभूमीवर नामाची एकदा ओढ लागली की, या मार्गानं का होईना, साधकाचं काम होईलच.

..८..

मना नाम घे, मना नाम घे, नकोच दुसरा छंद ! ।।धृ।।

देहसुखाला सदैव जपशी । स्वार्थ साधण्या तत्पर असशी।
खरे सांग परि अशांत का तू, का न टिके आनंद ?
कधी न देतिल आनंद तुज हे अशाश्वताचे छंद ।।१।।

शिक्षण घेशी, घरे बांधिशी । नातीगोती किती जोडिशी ।
खरे सांग परि अशांत का तू, का न टिके आनंद ?
कधी न देतिल आनंद तुज हे अशाश्वताचे छंद ।।२।।

रात्रंदिन किती राबराबशी । पैसा वस्तू गोळा करिशी ।
खरे सांग परि अशांत का तू, का न टिके आनंद ?
कधी न देतिल आनंद तुज हे अशाश्वताचे छंद ।।३।।

किती साधने सुखे उशाशी । जगी पुरविशी साऱ्या हौशी ।
खरे सांग परि अशांत का तू, का न टिके आनंद ?
कधी न देतिल आनंद तुज हे अशाश्वताचे छंद ।।४।।

देवधर्म अन् समाजसेवा । कला संस्कृती तुझा विसावा ।
खरे सांग परि अशांत का तू, का न टिके आनंद ?
कधी न देतिल आनंद तुज हे अशाश्वताचे छंद ।।५।।

जगी जगापरि अवश्य राही । छंद करी तू खुशाल देही।
परि जाण त्यातुनी न गवसे शाश्वतचा आनंद
मना शोध घे, मना बोध घे, नाम हा खरा छंद ! ।।६।।

नाम छंद भगवंत जोडतो । निरुपाधिक आनंद दावितो ।
दीन म्हणे तुज शांत करुनिया, अखंड दे आनंद
मना शोध घे, मना बोध घे, खरा एक हा छंद ! ।।७।।

मना नाम घे, मना नाम घे, नकोच दुसरा छंद !!

(ट्रॅक नं. १३१)

मूलतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या, देवगड तालुक्यातल्या, नारिंग्रे गावातल्या, खाजगी श्रीराम मंदिरातल्या उपास्य प्रेमळ श्रीरामाला उद्देशून लिहिलं गेलेलं हे पद, तिथल्या श्रीराम, सीता, लक्ष्मण आदींच्या कोमळ – प्रेमळ मूर्तींच्या दर्शनाचा अनुभव तर व्यक्त करतंच. पण सर्वत्र असलेल्या अन्य ठिकाणच्या सगुण श्रीरामाला आणि त्याच्या कार्यालाही ते अधोरेखित करतं. त्यात प्रथम पाहताक्षणी चित्ताला शांत करणारं, हे रामरूप आपला सीता, लक्ष्मण, हनुमान यांचा परिवार घेऊन प्रकट कसं होतं, हा पहिला आणि नित्याचाच दर्शनानुभव आहे. पण पुढं कर्तव्याला कठोर, अनेक आदर्शांची प्रतिमूर्ती, शरणागतांचा मात्र सदैव रक्षक, क्षमेला तितकाच थोर, निःस्वार्थी असं रामाचं अवतारी गुणरूप या पदात प्रधान आहे. अखेर श्रीरामानं आपल्याला त्याच्या चरणी विसावा द्यावा आणि त्याचं निष्काम प्रेम द्यावं, हे भक्ताचं व्यक्तिगत आर्त मागणंही मार्गदर्शक आहे.

..९..

पाहता नयनांसी विश्राम ।
माझा कोमळ प्रेमळ राम ।।धृ।।

अभिन्न सीता, लक्ष्मण भ्राता ।
घेउनि दासा श्री हनुमंता ।
प्रगटे मेघश्याम ।।१।।

कठोर किति तू कर्तव्यांसी ।
रक्षिसी परी शरणजनांसी ।
आदर्शांचे धाम ।।२।।

नि:स्वार्थाची तू परिसीमा ।
बाण उद्धरी, अतुल तव क्षमा ।
अपूर्व तारक नाम ।।३।।

मूल्यरक्षणा, सगुणनिर्गुणा ।
दीना बळ दे येण्या चरणा ।
प्रेम जडो निष्काम ।।४।।

(ट्रॅक नं. १३२)

आपल्या रोजच्या व्यवहाराविषयी आपल्याला सावध करणारं हे पद आहे. माणसाची, माणूस म्हणून खरी प्रगती न होण्याची कारणं मनापासून शोधली तर, असं लक्षात येतं की, माणसाला त्याच्या ठिकाणी असलेल्या क्षमतांची पूर्ण जाणीव नसते. त्या क्षमता त्याला कुणी दिल्या, त्याची जाणीव नसते. अशा अलौकिक क्षमता देण्यामागं त्या देणाऱ्याचा काही हेतू असेल का ? हाही विचार त्याच्या मनात फारसा येत नाही. तो विचार आलाच तर, मग त्या क्षमता देणाऱ्याच्या हेतूला धरून आपण आपलं जीवन जगतो का ? हाही विचार तो करू लागेल. हे सगळं जर मनापासून घडलं तर मात्र, त्याचं जीवन चांगल्या अर्थानं बदलून जाईल. समाजालाही अधिक उपयोगाचं ठरेल. त्याच्या स्वतःच्या उद्धाराच्या दृष्टीनंही असं जीवन प्रगतीचं होईल.

..१०..

सावध व्हा रे सावध व्हा ।
जाग धरा रे जाण धरा ।
उदंड सोने हिरे उधळितो ।
फुकट मिळाले ध्यानि धरा ! ।।धृ।।

नरदेहाचे सोने मुबलक ।
कष्ट न करिता झालो मालक ।
कसे कुठेही खर्च करावे ।
होइल का हो न्याय खरा ? ।।१।।

जे जे आम्हा मिळते जगती ।
ते इतरांच्या साह्यावरती ।
स्वार्थापुढती सुचे न काही ।
पटेलसा व्यवहार करा ! ।।२।।

बुद्धी शक्ती हिरे माणके ।
दीन म्हणे रे दिली कौतुके ।
दाता आणिक हेतु विसरता ।
ठरेल ना हो पशू बरा ? ।।३।।

(ट्रॅक नं. १३३)

प्रत्येक माणसाचं जगण्याचं काही बलस्थान असतं. कुणी शारीरिक शक्तीवर, कुणी बुद्धीच्या जोरावर, कुणी पैशाच्या जोरावर, कुणी धैर्याच्या जोरावर जगतो तर, कुणी सत्तेच्या जोरावर जगतो. एरवीचं नेहमीचं जगताना तर, त्याला हा जोर उपयोगी असतोच पण, जेव्हा काही वेळप्रसंग येतो त्यावेळी बुद्धीवाला बुद्धीचा विशेष वापर करून, पैसावाला पैशाचा विशेष वापर करून, त्यातून मार्ग काढतो आणि तो–तो प्रसंग निभावतो. अशी यांतली कुठली बळं असोत वा नसोत भक्तांना जगायला खरं बळ कुठलं असेल तर, ते भगवंताच्या नामाचंच होय. या इतर बळांपेक्षाही एरवी साधं आणि दुबळं वाटणारं हे नामबळ कसं आणि किती श्रेष्ठ आहे, हेही या पदामधे स्पष्ट झालं आहे.

..११..

शक्तिबुद्धिधनधीरबळे कुणि
कशावरी जगतो ।
आम्ही नामबळे चालतो,
जगतो, नामबळे बोलतो ।।धृ।।

कर्तृत्वाने नमविति विश्वा,
'मी' न नमविता येतो ।
तोच न उरतो नामबळे अम्ही,
जग पुसुनी टाकतो, लीलया ।।१।।

देहसुखाचे घडण्या प्राणी
रात्रंदिन राबतो ।
प्रारब्धावरि देह टाकुनी,
नामबळे हासतो, राहतो ।।२।।

नामचि खातो, नाम प्राशितो
नामावर जगतो ।
दीन म्हणे अम्ही नामकृपेने,
सार्थकही साधितो, जिवाचे ।।३।।

(ट्रॅक नं. १३४)

आयुष्यात माणसाला कधीकधी हतबल झाल्याचा अनुभव येतो. सारी शक्ती पणाला लावूनसुद्धा पुढं अंधार पसरतो. हे प्रपंचातच घडतं, असं नाही. पारमार्थिक वाटचालीतसुद्धा अशी अवस्था येते. शम–दमांसारखी साधनं करून मिळवलेली सारी आध्यात्मिक ताकदसुद्धा काही वेळा कमी पडते आणि खचल्याचा, समोर अंधार पसरल्याचा अनुभव येतो. अशा खचलेल्या किंवा खचू शकणाऱ्या मनाला, जीवनाच्या म्हणजेच प्रपंच आणि परमार्थ दोन्हींच्याही वाटसरूला या पदात खात्री दिलेली आहे की, अशा खऱ्या संकटात भगवंत मदतीला नक्की उभा असतो. आपलं संकट मात्र खरं असायला पाहिजे. ते अशा अर्थानं की, आपल्या क्षमतेतली कुठलीही गोष्ट करायची शिल्लक असता कामा नये. मग मात्र पसरलेला तो अंधार दूर करायला भगवंत त्याच ठिकाणी आणि अगदी खात्रीनं प्रकाश घेऊन उभा असतो. या पदात दिलेल्या या अनुभवाचं आणि दिलेल्या या खात्रीचं नुसतं स्मरणसुद्धा अशा प्रपंच आणि परमार्थातल्या प्रवासात आणि प्रसंगात खचितच उपयोगी पडेल.

..१२..

अंधारुन हे किती येउ दे,
मना, ध्यानि तू ठेव
खऱ्या संकटी वाट उजळण्या
अचुक उभा रे देव ! ।।धृ।।

प्रसंगात कधि बुद्धी हरते
गणगोताची शक्ती सरते
आर्तासाठी सदैव सावध
स्मरण जागते ठेव ... ।।१।।

साधन करिता कोरड पडते
शमादमांचे पाणि न पुरते
अंतर्यामी झरा तुझ्या रे
दीना जाणिव ठेव ... ।।२।।

(ट्रॅक नं. १३५)

माणसं अनेक दिसतात. त्यांची दुःखंही अनेक दिसतात. वरवर पहाता त्यांच्या दुःखांची कारणंही अनेक दिसतात. कारण स्थल–काल–परिस्थिती वेगवेगळ्या वाटतात. पण अधिक खोलवर विचार केला तर, त्यांच्या या वेगवेगळ्या भासणाऱ्या दुःखांच्या मुळाशी त्यांच्या त्यांच्या अनिवार, अयुक्त इच्छाच असतात, हे लक्षात येईल. त्या सातत्यानं आकाराला येत रहातात. माणसाला त्यांच्या त्यांच्या पूर्तीसाठी दारोदार फिरायला लावतात आणि शेवटी पुन्हा अतृप्त ठेवतात, दुःखात ठेवतात. अपुऱ्या इच्छाच माणसाच्या जन्माला कारण होतात आणि त्यांना कुठला अंत नसल्यानं आपण बेसावध राहिलो तर, त्या शेवटीही अपुऱ्या राहून पुन्हा नव्या जन्मालाही कारण ठरतात. त्यांतल्या काही पुऱ्या झाल्याच तर, उरलेल्या कुठल्यातरी अपुऱ्या असल्यानं जिवाला सदैव तळमळत ठेवतात. म्हणून आपण इच्छांच्या या अनिवार व्यापाराबद्दल वेळीच सावध होऊन, निदान या जन्मी तरी, वाटचाल केली तर, मुक्तीचा आनंद अनुभवू शकू. त्यासाठी आपल्याला अवलंबण्यासारखे तीन मार्ग या पदात शेवटी आले आहेत. त्याचा आपण विचार करावा.

..१३..

अवघी इच्छा ही अनिवार ।
फिरवी दारोदार ।।धृ।।

रोज उगवता सवेच येई ।
मावळले तरि सोबत राही ।
धरिते स्वप्नांचा आकार ।।१।।

ती जन्माचे कारण होई ।
तळमळ जीवा सदैव देई ।
व्यापुनि अंतरंग व्यवहार ।।२।।

सात्त्विक राजस असो कशीही ।
तृप्तीलाही पुरुन उरे ही ।
वाटे माया ही साकार ।।३।।

इच्छा अपुले मरण क्षणोक्षण ।
दीना धरि रे तू सावधपण ।
तरणे इच्छेचा व्यापार ।।४।।

स्वार्थी इच्छा नको ठेवणे ।
गुरुइच्छेने अथवा जगणे ।
नेइल निरिच्छता भवपार ।।५।।

(ट्रॅक नं. १३६)

कृपापदं, साधनपदावली यांसारखी व्यक्तिगत पारमार्थिक वाटचालीला उपयोगी ठरणारी साधनं, ज्यांच्या प्रेरणेमुळं आणि कृपेमुळं आकाराला आली आणि साधक बंधुभगिनींच्या सेवेत रुजू झाली, त्या श्री गोंदवलेकर महाराज यांचं कृतज्ञ स्मरण करणारा, हा अभंग आहे. श्रींच्या कृपाशिष्याचं हे मनोगत तर आहेच. पण व्यापक अर्थानं, कुठल्याही भगवत्‌रूप सद्‌गुरूंना हा अभंग लागू होणाराच आहे. त्यात माणसाच्या प्रापंचिक आणि पारमार्थिक वाटचालीत गुरूंचा आलेला अनुभव मांडलेला आहे. प्रपंचात यशस्वी होण्यासाठी ज्या ज्या गोष्टींचा माणसाला आधार वाटतो– उदाहरणार्थ जवळची माणसं, पैसा–अडका, घरदार – अशा गोष्टी वेळेला कशा फोल ठरतात, लटक्या पडतात हे सांगून पुढं इथं म्हटलं आहे की, अशावेळीसुद्धा हा आधार द्यायला, सावरायला न चुकता धावून येतात, ते गुरूच. तीच अवस्था परमार्थात भगवंतप्राप्तीची आहे. त्या वाटचालीतसुद्धा आपली बुद्धी , ज्ञान , आपण केलेली सत्कर्मं, आपलं धर्माचरण यांवर आपली मोठी मदार असते. पण अखेर तेसुद्धा लटकं पडतं आणि देव भेटवून द्यायला असमर्थ ठरतं. अशावेळी देवाची भेट घडवून आणायला धावतात ते श्री महाराजच, हा प्रांजळ अनुभव आहे.

..१४..

ब्रह्मचैतन्यांचा आधार ।
एक निरंतर, आम्हा ।।धृ।।

मित्र पुत्र बाप माय
जो तो पाही अपुली सोय ।
प्रसंगात कोणी न ये
जवळ केले गुरूराये ।
गुरुराव सदा आधार, आम्हा.. ।।१।।

वाटे पैसा कामी येई
घरदार हात देई ।
उपयोगा न ये पाही
गुरुरायावीण काही ।
गुरुराव देई आधार, आम्हा.. ।।२।।

वाटे बुद्धिज्ञानकर्म
देव भेटवील धर्म ।
कसे ठरे फोल तेही
गुरुवीण सारे काही ।
दीन म्हणे एक आधार, आम्हा..।।३।।

(ट्रॅक नं. १३७)

ज्याच्या हृदयात एकदा भगवंताच्या जिज्ञासेची ज्योत प्रज्वलित झाली आहे, तो, या ना त्या मार्गानं देवाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतोच. या शोधाचा अनुभव मांडताना या पदात म्हटलं आहे की, तात्त्विकदृष्ट्या शोध घेतला तर, तत्त्वातत्त्वांचा काही मेळ बसत नाही, असं आढळतं. मनोमार्गे शोधलं तर, इतकी मतं दिसली की, सारी कल्पनेची साम्राज्य वाटू लागली. एकूण जनी–वनी–मनी सगळीकडं घेतलेल्या शोधानं देव न सापडता उलट चित्त आणखीच भ्रमतं, असा अनुभव आला.

नंतर मात्र, हे सारे शोध बाजूला ठेवून, सद्‌गुरूंना शरण जाऊन, श्रद्धेनं संतप्रणीत नामाची कास धरताच मात्र काय कृपा झाली पाहा. शोधून न सापडणारा देव तर सापडलाच, पण नामाच्या रूपानं त्याचे साक्षात प्राणही हाती आले. नामनिष्ठेनं आणि शरणागतीनं हे घडलं. या अनुभवातून शिकण्यासारखं आहे, असं म्हणावंसं वाटतं.

..१५..

देव शोधिता शोधिता । प्राण सापडले हाता ।।धृ।।

वाया गेला अवघा वेळ । घालिता तत्त्वांचा मेळ ।।१।।

मन पिंजता पिंजता । व्यर्थ गोळा झाला गुंता ।।२।।

किती भाषा किती मते । सारे कल्पनेचे गोते ।।३।।

जनी वनी धांडोळिता । भ्रमे भुलविले चित्ता ।।४।।

दीन म्हणे कृपा होता । 'नाम' 'प्राण' आले हाता ।।५।।

(ट्रॅक नं. १३८)

आपल्या आयुष्याचं खरं सार्थक शाश्वत समाधान मिळवण्यात किंवा भगवंताच्या प्राप्तीत आहे, हे एकदा लक्षात आलं की, माणूस ते साध्य करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधू लागतो. ज्यांची कर्मप्रवण ठेवण आहे, ते विशेषतः कर्मयोगाचं आचरण करू जातात. योगमार्गाची कुवत आणि आवड असणारे त्या मार्गानं जातात. बुद्धिप्रधान ठेवण असलेले ज्ञानमार्गाची कास धरतात तर, भावभक्तीची बैठक असणारे भक्तिमार्गाला लागतात, असं आपण पाहातो. पण सावधपणे प्रत्यक्ष हे मार्ग चालणाऱ्याच्या हे लवकरच लक्षात येतं की, हे काम कुठल्याही मार्गानं केलं तरी, वाटतं तितकं सोपं आणि जवळचं नाही. कुठं फळात अडकणं, कर्माचीच आवड लागणं, साध्याचा विसर पडून साधनच महत्त्वाचं होणं, केल्याचा अहंकारच होणं, कुठं भाबडेपणा, कुठं अज्ञान, कुठं भ्रम – असे अनेक धोके आणि खाचखळगे या वाटचालीत आहेत. अशामुळं ध्येय गाठायला अनेक जन्महीं लागतील, म्हणून सोपा उपाय शरणागतीचा. त्यातही आपला अहंकार कुठल्या ना कुठल्या रूपानं आड येतोच. मग उरतो तो एकच उपाय. हे सारं समजून मुकाटपणे सगुणदेवांच्या म्हणजेच संतांच्या सावलीला जाऊन बसणं, संतांच्या छायेत जाऊन, सावलीसारखं सदैव नुसतं त्यांच्या बरोबर राहायचा प्रयत्न करणं. संतांची कृपा झाली की, भगवंताची प्राप्ती झालीच. किंबहुना संतसहवास हाच त्यांतल्या त्यात एक सोपा मार्ग दिसतो. प्रत्यक्ष देहानं संतांच्या छायेत राहाता आलं तर, सर्वांत उत्तम. पण ते न जमलं तरी, निदान संतवचन, संतविचार यांच्या सावलीत राहाणं किंवा त्यांनी सांगितलेलं साधन अहोरात्र करण्याच्या मार्गानं जाता आलं तरी, संतछायेत राहिल्यासारखं होईल. या मार्गाची खात्री अशासाठी आहे की, संतांना सामान्यांच्या साऱ्या देहबुद्धीच्या अडीअडचणी, त्यांच्या असमर्थता, सामान्यांची तळमळ, तगमग या साऱ्यांची नुसती जाणच नव्हे तर, त्याबद्दल आत्यंतिक करुणाबुद्धीही ठेवली आहे. त्यामुळं संत सामान्यांना नुसतेच समजून घेत नाहीत तर, त्यांना सोबत देऊन, हात धरून, उद्धरून नेतात. असं सामर्थ्य असलेल्या संतांच्या छायेत मला सदैव ठेवा, अशी तळमळीची प्रार्थना या पदात केली आहे.

..१६..

सदा संतछाया देई देवराया ।
तेणे याचि काया उद्धरेन ।।धृ।।

उद्धरेन त्यांनी केल्यावरी कृपा ।
हाचि मार्ग सोपा दिसतसे ।।१।।

दिसतसे साधन कर्म योग ज्ञान ।
अवघे हे कठीण वाटतसे ।।२।।

वाटतसे शरण जाणेही कठीण ।
माझे मज मीपण आड येते ।।३।।

आड येते त्याला सगुण उपाय ।
सावलीसी जाय संतांचिया ।।४।।

संतांचिया ठायी अपार ही दया ।
दीना उद्धराया राखतील ।।५।।

(ट्रॅक नं. १३९)

आपल्या जीवनात भगवंताची, त्याच्या अस्तित्वाची, त्याच्या कृपेची, त्याच्या असीम करुणेची आणि त्याच्या प्रेमाची जी जाणीव गुरू आपल्याला करून देतात, तिला तोड नाही. त्या जाणिवेची जणू वाकळच आपल्या अंगावर घालून, देहबुद्धीनं कुडकुडणाऱ्या जिवाला आत्मानंदाची ऊब ते मिळवून देतात. हे एकदा करून ते बाजूला होत नाहीत तर, त्यांचे उपकार हे की, एकदा आपला म्हटलेला हा जीव जेव्हा जेव्हा पुढं विकारांच्या तावडीत सापडेल, मनाच्या चंचलतेत गुरफटेल, देहबुद्धीच्या तडाख्यात सापडेल, तेव्हा तेव्हा त्याला सावरण्यासाठी हे भगवंताचं स्मरण त्याच्या ठिकाणी जागं करून, त्याला त्या आवेगातून, त्या तगमगीतून, त्या चिंतेतून काढायला ते गुरू धावून येतात, असा अनुभव येतो. हे सारं गुरूंचं कार्य आणि त्यांचे उपकार या पदात भावपूर्णपणे साकारले आहेत.

..१७..

हरिस्मरणाची, हरिकरुणेची, हरिकृपेची, हरिप्रेमाची –
वाकळ मज दिधली, गुरूने वाकळ पांघरली,
मला हो, वाकळ पांघरली ।।धृ।।

हवेपणाची भरे हुडहुडी
नकोपणाची त्यात तातडी
देहबुद्धिने काकडता मी
उपदेशाची घालि घोंगडी, ऊब मला दिधली... ।।१।।

कधी मोह हा डाव साधितो
क्रोधाचाही वणवा जळतो
त्यात पोळता मला पाहुनी
गुरुकृपेचा घनू बरसतो, तगमग ही हरली... ।।२।।

अविवेकाचे झोंबे वारे
चंचल हे मन कुठे न थारे
तळमळ चिंता सदा काळजी
दीन म्हणे गुरु 'स्मरण' जागवी, चिंता नच उरली... ।।३।।

(ट्रॅक नं. १४०)

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांनी सर्वसामान्य माणसांची परिस्थिती लक्षात घेतली. त्यांचा आजचा काळ लक्षात घेतला. त्यांचे सारे प्रश्न लक्षात घेतले आणि श्री महाराजांचं वैशिष्ट्य हे की, कोणत्याही परिस्थितीतल्या या सामान्य माणसालाही देवदुर्लभ असा आनंद कसा गाठून देता येईल, याची अगदी सोपी, सर्वांना लागू होईल अशी विद्या त्यांनी प्रसृत केली. त्यामुळं लक्षावधी लोकांच्या जीवनात आनंदाचा मळा फुलला आणि आजही फुलतो आहे. एका दृष्टीनं व्यवहार्य परमार्थाची शाळाच श्री महाराजांनी चालवली. त्यांच्याच प्रेरणेनं, त्यांच्याच उपदेशाच्या रूपानं आजही ही शाळा सर्वत्र भरते आहे आणि आनंदाचे पदवीधर निर्माण करते आहे. या शाश्वत शाळेची काही वैशिष्ट्यं या पदात नेमकेपणानं व्यक्त झाली आहेत.

..१८..

महाराजांची शाळा, अमुच्या महाराजांची शाळा ।
नकळत सकळां वळण लाविते,तरी लागतो लळा ।।धृ।।

नाही भिंती नाही छप्पर । खडू फळा ना कुठले दप्तर ।
ग्रंथ जयाचा तयाबरोबर । उघडा आणिक चाळा ।।१।।

घरी, मंदिरी, झाडाखाली । झोपडीत वा भरे महाली ।
पसरविते ही प्रेमा आणिक । भक्तीच्या परिमळा ।।२।।

पति, पत्नि वा मित्र असू दे । बाप लेक वा नात असू दे ।
सगळे शिकती एका ठायी । परि धडा वेगळा ।।३।।

विनामूल्य हे अमूल्य शिक्षण । कर्तव्याचे अवश्य पालन ।
व्यवहारातिल परमार्थाचा । पहा पिकविते मळा ।।४।।

आदी अंती नाम शिकविते । समाधान ही पदवी देते ।
तरी पुन्हा शाळेत रहाणे । दीन म्हणे सोहळा ! ।।५।।

(ट्रॅक नं. १४१)

हाती धरलेल्या मुमुक्षूलाच नव्हे तर, बद्ध शिष्यालाही मुक्त करणं, हे खऱ्या सद्‌गुरूंचं कार्य होय. माणसाला मुक्ती आणि तिचा देवदुर्लभ आनंद हवा असला, त्याचं खरं आकर्षण असलं तरी, त्याला स्वतःला सुखावणारे, त्याचे स्वतःचे नित्याचे बंध तो सोडायला मात्र तयार नसतो. त्याचं हवेपण, त्याची पूर्ती, त्याच्या घरादारासकट साऱ्या मालमत्ता, त्यांचा संग्रह, त्यांचं आकर्षण, त्याचे आवडीचे विषय, मतं, आग्रह – या कुठल्याच बंधनांना तो आपणहोऊन सोडीत नाही. उलट त्यांचं त्याला प्रेम वाटतं. त्यात काही कमी असलं तर, ते मिळवायला म्हणजेच, या माणसाच्या आसक्तींना आणि बंधनांनाच, त्याच्या गुरूंनी मदत करावी, अशी त्याची इच्छा असते. अर्थात, हे देण्यात किंवा त्यानं जपलेल्या त्याच्या मालमत्तांचं रक्षण करण्यात शिष्यांचं अहितही असतं. सक्तीनं काढून घ्यावं तर, तो दुःखीही होतो. वेळी गुरू आणि साधनसुद्धा सोडील, अशी अवस्था असते. अशा पेचात कुशल गुरू त्याच्या मागण्या पुरवता–पुरवता त्याला हवेपणातून, अकारण संचयातून, अवाजवी भीतीतून कसं मुक्त करतात, ते पहाणं मोठं आनंदाचं असतं. अर्थात, एका दृष्टीनं ही शिष्याची लौकिकदृष्ट्या थोडी फसगत वाटत असली तरी, आध्यात्मिकदृष्ट्या आणि त्याच्या कल्याणाच्या दृष्टीनं मोठी गरजेची आणि कौशल्याची करामत असते. इतकंच काय, जेव्हा या आसक्ती सुटतात, तेव्हा मग मिळणाऱ्या मुक्ततेचा आनंद इतका विशाल असतो की, गुरूंनी कौशल्यानं आपल्याला या साऱ्या हवेपणातून सोडवलं, आपलं सारं हवेपण घालवलं – याचाच होणारा आनंद मनात मावेनासा होतो. किती आसक्ती, चिंता, भीती – यांचा कचरा आपण वर्षानुवर्षं मनात मोठ्या कौतुकानं आणि गरजेचा म्हणून सांभाळला होता आणि सद्‌गुरूंनी तो किती कौशल्यानं काढून मन हलकं, स्वच्छ आणि मुक्तीला, ईश्वरदर्शनाला योग्य केलं. या साऱ्या आनंदाच्या, हव्याशा वाटणाऱ्या फसवणुकीचं, ती करून आपल्यावर कृपा करणाऱ्या सद्‌गुरूंचं गुणगान करावंसं वाटतं, हा प्रत्यक्ष अनुभव या पदात प्रभावीपणे आला आहे.

..१९..

माझ्या देवाने मला फसविले
सारे सांभाळितो म्हणुनिया घालविले
हो, माझ्या देवाने मला फसविले ।।धृ।।

हवे मला जे दिसे सुचे ते
'मी असता तुज कमी कशाते !'
मला देता देता हवेपण घालविले ।
हो, माझ्या देवाने मला फसविले ।।१।।

म्हणे 'घराचे करि मी रक्षण
चीजवस्तुही मी सांभाळिन !'
मला आनंदात ठेवुनिया लुटविले ।
हो, माझ्या देवाने मला फसविले ।।२।।

चिंता चिंतन मज गोडीची
म्हणे 'मला दे ओझी माझी !'
ओझे घेउनिया डोळ्यांपुढे जाळियेले ।
हो, माझ्या देवाने मला फसविले ।।३।।

वाटे मजला भय मरणाचे
'मी असता तुज भय न कशाचे !'
दीना जितेपणी मारुनिया तारियेले ।
हो, माझ्या देवाने मला फसविले ।।४।।

(ट्रॅक नं. १४२)

कलियुगातली भगवंताची सगुण मूर्ती म्हणजे श्री ज्ञानेश्वर माउली, श्री तुकोबा अशांसारखे संत होत. ज्यांना भेटल्यावर चित्ताला विश्रांती होते. ज्यांच्याजवळ आपलं सारं सुखदुःख मनमोकळेपणानं बोलावंसं वाटतं. जे आपले माय–बाप, बंधू–सोयरे सारं होऊन आपल्याला विसावा देऊ शकतात, असे हे निःस्वार्थी संत स्वतःचे लौकिक प्रपंच, त्याचं सुखदुःख स्वतःच्या देहव्याधी सारं–सारं बाजूला ठेवून इतरांच्या कल्याणासाठी ईश्वराच्या इच्छेप्रमाणं आयुष्यभर कष्ट करीत राहतात. त्यांच्या ठिकाणी ना कुठला अहंभाव असतो, ना त्यांनी दुसऱ्यावर केलेल्या अपार उपकारांची जाणीव असते. लहान–थोर, जात–पात, गरीब–श्रीमंत, दुर्बल–सबल, कसलेच भेदाभेद न करता ते सर्वांना तितक्याच तळमळीनं उपयोगी पडतात, बोध करतात, कृपाही करतात. आपल्या अनंत चुका आणि अवज्ञा पोटात घालून, पुन्हा आपल्याच कल्याणाची चिंता वाहणाऱ्या आणि आपण कसेही वागलो तरी, आपल्यावरच प्रेमवर्षाव करणाऱ्या या संतांच्या पायाशी आपल्याला सदैव ठेवावं, असं अपार कृतज्ञतेनं या पदात भगवंताला म्हटलं आहे. ज्यांना संतमहात्म्य जाणवलं आहे, त्यांनाही भगवंताला असंच म्हणावं वाटेल, यात शंका नाही.

..२०..

देवा, संताचिया पायी ठेवा । मजला ।।धृ।।

सुखासाठी कोठे जावे । दुःख कोणासी सांगावे ।
सर्व भावांसी विसावा । संत शांत करिती जीवा ।।१।।

जग झिजे स्वार्थासाठी । कोणी नसे कोणासाठी ।
संत मात्र करिती सेवा । जगासाठी झिजविती जीवा ।।२।।

भेदभावासी ना स्थान । बोध, कृपाही समान ।
संत कल्याणाचा ठेवा । तेथे घोटाळूदे जीवा ।।३।।

संत घेती सांभाळून । प्रेमवर्षाव करून ।
देव सगुण पहावा । ऐसे वाटे दीन जीवा ।।४।।

(ट्रॅक नं. १४३)

* २. नित्यपाठ *

नित्यपाठांची भूमिका

उपासनेच्या विविध साधनांमध्ये नित्यपाठांचं स्वतःचं एक स्थान आणि उपयुक्तता आहे. साधनेच्या दृष्टीनं साधकाला विचाराला प्रवृत्त करणं, शाश्वत सत्य, प्रपंचाचं खरं मूल्य, भगवंताविषयीची जाणीव, वेगवेगळ्या साधनमार्गांची महती – असे विविध विषय समोर ठेवणं, त्यांवरचे अधिकारी, प्रत्ययनिष्ठ अनुभव मांडणं – अशी कार्यं या नित्यपाठांतून होत असतात. त्यामुळं नवे विषय कळण्याबरोबरच कळलेले विषय आणि पारमार्थिक जाग ताजी ठेवायला, असे नित्यपाठ मोलाची मदत करतात. श्रीकृपेनं इथं रचलेले विचारगीता, बोधपाठ, सृष्टिसंदेश, गुरुतत्त्वतरंगिणी, विनवणीची वाणी – यांमधील सृष्टिसंदेश व विनवणीची वाणी असे दोन नित्यपाठ या कृपापदावलीतून जिज्ञासू साधकांसाठी पुढं ठेवले आहेत.

यापुढील ट्रॅक नंबर्स

१. विनवणीची वाणी – १४७
२. सृष्टिसंदेश गायन – १७५
३. श्रीगणेश पूजन मंत्र व सममंत्र – १५८ ते १६५
४. मानसपूजा – १५१ व १५२

*

विनवणीच्या वाणीची भूमिका

विचारी माणसाला अंतर्मुख करणारे एकूण चौदा अभंग या विनवणीच्या वाणीत समाविष्ट झालेले आहेत. त्यांतला पहिला अभंग प्रांजळ प्रास्ताविकाचा आहे. तर चौदावा अभंग सारांश आणि प्रार्थनेचा आहे. आपण शांत चित्तानं स्वतःच्या आणि इतरांच्या आयुष्याकडं, संबंधांकडं, घटनांकडं, अनुभवांकडं खऱ्या जिज्ञासेनं पाहिलं तर, आपण मुळातच देह धारण का केला किंवा का करावा लागला, यांपासून निर्माण होणारे सारे प्रश्न त्यांतल्या दुसऱ्या आणि तिसऱ्या अभंगांत आलेले आहेत.

आपण देहात – संबंधांतच नव्हे तर, जगातसुद्धा एका अर्थानं काही कारणांनी सक्तीनं अडकलेले आहोत, बंधनांत अडकलेले आहोत, या स्थितीची मनापासून जाणीव झाली तर, आपलं सध्याचं जीवन या बंधनांतून सुटण्याचे आपले तथाकथित कर्मांचे,समाजसेवेचे, बेफिकिरीचे असे अनेक प्रकारचे मार्ग आणि त्यांच्यातल्या पुन्हा अडकवणाऱ्या किंवा मार्ग फोल ठरवणाऱ्या कृती आणि परिणाम चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या अभंगात आले आहेत.

या साऱ्यांच्या व्यर्थता लक्षात आल्यावर सातव्या अभंगापासून या साऱ्या अनिष्ट आणि बंधकारक चक्रातून सुटण्याचे विचार, अनुभवसिद्ध दिशा, संतांच्या थोरवीचे, त्यांनी दाखवलेल्या मार्गांचे अनेक पैलू – यांचं विवरण तेराव्या अभंगापर्यंत आलं आहे. संतांच्या थोरवीची दहा तरी लक्षणं यांतल्या नवव्या, दहाव्या आणि अकराव्या अभंगात आली आहेत. ज्यांच्यामुळं संतजीवनाकडं बघण्याची आणि अन्यत्र दिलेल्या त्यांच्या मार्गदर्शनाची दृष्टी येईल, त्यांची महती कळेल. आपण आपापल्या परिस्थितीत आपल्या ठायी राहून आपली बंधमुक्तता कशी साधावी याचे अनेक मार्ग, वाटा, त्यांतल्या सावधानता या नित्यपाठातल्या सातव्या अभंगापासून तळमळीनं समोर येत आहेत.

शेवटच्या चौदाव्या अभंगात सर्वांच्या कल्याणाची कामना करणारी, ही विनवणीची वाणी, ही आपली आपण मुक्तता करून घेण्यासाठीची निःस्वार्थी, आर्त हाक आहे, ही भूमिका लक्षात ठेवून या पाठाकडं पाहिलं तर, हा आर्त नित्यपाठआपल्याला अंतर्मुख करील योग्य विचार आणि कृतींना प्रेरक ठरेल.

*

२. विनवणीची वाणी

(१)

माझी विनवणीची वाणी । तुम्ही ऐकावी सज्जनी ।।धृ।।
थोडे व्हावे कृपावंत । बाळवचनी देण्या चित्त ।।२।।
वय अनुभव थोर । श्रेष्ठ आपुला अधिकार ।।३।।
धन, मान अपुली सत्ता । मी तो कणही ना पुरता ।।४।।
दीन बोले तरि हे वचन । पटता मानावे प्रमाण ।।५।।

(२)

देह धरणे का हो लागे । काळ का लागे हो मागे ? ।।१।।
मायबाप नाही हाती । पराधीन अवघे होती ।।२।।
भेट, गाठ,स्थिती याला । जीव जन्माने बांधला ।।३।।
अवघ्या बंधांचे कारण । कोणी काढावे शोधून ।।४।।
दीन म्हणे हे ना करणे । पुन्हा जन्मा यावे त्याने ।।५।।

(३)

ज्यांनी पोटास घालावे । त्यांचे दास लागे व्हावे ।।१।।
ज्यांनी दाखविली माया । त्यांना द्यावी लागे काया ।।२।।
कोणाचे ना काही घ्यावे । कैसे जीवन चालावे ? ।।३।।
देणे चुकवूनी जगावे । ओझे वाढते स्वभावे ।।४।।
दीन म्हणे काही करा । अपुली आपण सुटका करा ।।५।।

(४)

ज्याला वाटे करीन कर्म । सांभाळीन अवघा धर्म ।।१।।
त्याला गाठी अहंकार । बांधणारा चोर थोर ।।२।।
समाजाची सेवा करता । मानउपेक्षा ये हाता ।।३।।
वाढवावे ना गणगोत । परके येतसे गळ्यात ।।४।।
दीन म्हणे मार्ग शोधा । ज्यात नाही कुठ्ली बाधा ।।५।।

(५)

जरी रहावे बेफिकिर । तरी वणवण ना चुकणार ।।१।।
जरी बेसावध व्हावे । नक्की लागे पुन्हा यावे ।।२।।
मौजे ल्यावे, खावे, प्यावे । देह थकता दीन व्हावे ।।३।।
पैसा, प्रतिष्ठा तोवर । पाहुण्यांची येरझार ।।४।।
दीन म्हणे दाणे नुरती । पहा उरती का सोबती ।।५।।

(६)

कोणी करी ना विचार । कसा आलो येथवर ।।१।।
प्रारब्धाचे चाले खाते । अवघे जमती घेते–दाते ।।२।।
वाटे आपण करितो सारे । प्रसंग येता कळते खरे ।।३।।
म्हणुनी त्यात ना अडकावे । हिशेब पुरते होऊ द्यावे ।।४।।
दीन म्हणे आता शोधा । कधी थांबेल हा धंदा ।।५।।

(७)

बाकी मागील चुकवावी । कोठे काही न ठेवावी ।।१।।
नव्या कर्तृत्वाचा भार । नका घेऊ अपुल्यावर ।।२।।
करो प्रारब्ध व्यवहार । उभे आपण दूरवर ।।३।।
त्याला सापडेल वर्म । कसे जगावे उत्तम ।।४।।
दीन म्हणे हलके करा । जुने सारे पूर्ण करा ।।५।।

(८)

जरी देह प्रारब्धाचा । दास न लागे व्हावे त्याचा ।।१।।
देही मालक जागृत राहे । त्याला सोपे सारे आहे ।।२।।
मूळ चैतन्य तो प्राण । देही नांदे नारायण ।।३।।
त्याचे आपण कैसे व्हावे । तेच लागते जाणावे ।।४।।
दीन म्हणे त्याचे वर्म । संतवचनी होते काम ।।५।।

(९)

संतांअंगी थोरपण । येत नाही अकारण ।।१।।
तेही देहात येतात । पुरी प्रारब्धे करतात ।।२।।
परी कालातीत होती । जना बोधूनीया रीती ।।३।।
नित्य सावध होती चित्ती । वरी योग्य कर्मे करिती ।।४।।
दीन म्हणे संतरीत । हाती येता सुटते गणित ।।५।।

(१०)

म्हणुनी संतांचे महिमान । देव देती त्यांना मान ।।१।।
तेचि देव संस्थापिती । सगुण साक्षात करवीती ।।२।।
कसे कर्तव्य करावे । कसे अंतर बदलावे ।।३।।
काळावरती करिती मात । करिती प्रारब्धाचा अंत ।।४।।
दीन म्हणे जाणा त्वरे । संत करावे सोयरे ।।५।।

(११)

सोपे नामाचे साधन । त्यांत कर्तव्यांचे भान ।।१।।
देह कारणी लावावे । सर्व संतांनी शिकवावे ।।२।।
स्वामी देहाचे होऊनी । व्हावे ज्ञानी वा विज्ञानी ।।३।।
संत फिरती अथवा बसती । हित जगाचे साधती ।।४।।
दीन म्हणे अवघ्या युक्ती । संतपायी शिकता येती ।।५।।

(१२)

काळ जातो जैसा पुढती । सुखसाधने वाढती ।।१।।
पैसाभोगांची ही भूल । दु:ख, अस्वास्थ्य देईल ।।२।।
कळे त्याने सावध व्हावे । मायाबाजार जोखावे ।।३।।
जगचालीने वर्तावे । स्थिर अंतरी असावे ।।४।।
दीन म्हणे संतां शरण । त्यास नाही जन्ममरण ।।५।।

(१३)

सोपी संतांची या रीत । नाम ठेवावे चित्तात ।।१।।
देह स्वधर्मी ठेवावा । लोकव्यवहार राखावा ।।२।।
योग्य ऐहिक सांभाळावे । बंधमुक्त तेणे व्हावे ।।३।।
जातपात नाही यात । एक सर्व या मार्गात ।।४।।
दीन म्हणे सोपे आहे । थोडे करूनिया पाहे ।।५।।

(१४)

अंती जोडूनीया हात । म्हणे व्हावे कृपावंत ।।१।।
थोर आपण लक्ष द्यावे । स्वहित आपुले साधावे ।।२।।
वाटे बुद्धीने चालावे । तरी अभ्यासे पहावे ।।३।।
जरी पाहाल अनुभव । मग ठेवाल ना भाव ।।४।।
दीन मागे देवा दान । व्हावे सर्वांचे कल्याण ।।५।।

श्री संतचरणार्पणमस्तु ।।
श्री लोकचरणार्पणमस्तु ।।
श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ।।

*

२.सृष्टिसंदेश

सृष्टिसंदेशविषयी थोडेसे...

हे संदेश काव्यमय वाटले तरी ते कविता नव्हेत. आजच्या माणसाच्या निकृष्ट जीवनमानाला त्याची असंवेदनशील व स्वार्थी मनोवस्था कारणीभूत आहे. यावर उपाय म्हणून, तो ज्या सृष्टीचा एक उत्कृष्ट घटक आहे, तिला मार्गदर्शनासाठी प्रार्थना केल्यावर, तिच्याशी तादात्म्य झाल्यावर तिच्याकडून प्राप्त झालेले हे संदेश आहेत. त्यात सृष्टिव्यवहाराचे आत्मीय निरीक्षण आहे.

या संदेशातल्या पहिल्या चार ओळींमध्ये सृष्टीने स्वत:ची जडणघडण, तिचे जगण्याचे उच्चतर तत्त्व व आचरणाची पद्धत सांगितलेली आहे. तर शेवटच्या दोन ओळींमध्ये त्याच बाबतीत माणसाची जगण्याची पद्धत व त्याबद्दल त्याला असलेला संदेश आलेला आहे. सृष्टीचा व्यवहार सहज समोर येण्यासारखा असल्याने संदेशाच्या प्रास्ताविकात प्राधान्याने माणसाच्या आजच्या व्यवहाराचे विवरण केलेले आहे. सृष्टीत मनाचा व्यापार नसल्याने किंवा ती सचेतन नसल्याने आदर्श वागू शकते असे म्हणणे म्हणजे सृष्टीची सूक्ष्मता न कळण्याचे व निदान आपली शिकण्याची तयारी नसल्याचेच लक्षण ठरेल. कारण गुरूंचे गुरू झालेल्या श्री दत्तगुरूंच्या चोवीस गुरूंपैकी वीस गुरू हे मनुष्येतर सृष्टीचे घटक आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. यातून सृष्टीची शिकवण्याची क्षमता व शिकणाऱ्याची शिकण्याची क्षमता – नम्रता व थोरवी – हे बोधप्रद आहे.

सृष्टी इतकी समृद्ध आहे की माणसासारखी अपूर्व निर्मिती हा तिचा एक घटक आहे. त्याच्याकडून सृष्टीच्याही कर्त्याचा शोध घेणे व त्याचे भान राखणे अपेक्षित आहे. त्याने सृष्टीकडून शिकावे इतकेच नव्हे तर नि:स्वार्थीपणे, कृतज्ञतेने तिची योग्य काळजी घ्यावी हेही उचित आहे. असे असतानाही माणसाच्या अपरिमित स्वार्थाच्या व बेसावध जगण्याने, कर्त्याचा शोध व भान तर राहोच पण सृष्टीचेच विघटन आरंभले आहे.तसेच दुसऱ्या बाजूने तो स्वत:ही दु:खमय जीवनाकडे वाटचाल करीत आहे.

असे असले तरीही या माणसाकडेच हा सारा चुकत चाललेला प्रवास व तोल सावरण्याचे सामर्थ्य आहे, यावरच्या प्रगाढ श्रद्धेने हे संदेश व्यक्त होत आहेत.....

सृष्टिसंदेशमधील अभंग भूमिकांसह

(१)

माणसाचे आजचे जीवन भौतिकदृष्ट्या समृद्धीकडे चाललेले दिसते. तरीही माणूस आतून अत्यंत स्वार्थी, विघातक स्पर्धाशील, सर्वांचा स्वत:च्या सुखासाठी वापर करणारा – अशा प्रवृत्तींनी भरलेला आहे. त्यामुळे तो आतून आनंदात नाही. तसेच बाहेरच्या जगातही असंतोष, दिखाऊपणा, प्रौढी, पोकळ डौल – अशा अनेक अस्वास्थ्यकारक गोष्टींचा सुकाळ आढळून येईल. म्हणून सृष्टीमाय हा सारा व्यक्तिगत व सामूहिक पातळीवरचा प्रत्यक्ष व संभाव्य विध्वंस पाहून विषादाने हे तळमळीचे शब्द उच्चारीत आहे.

(२)

माणूस आज समृद्धीच्या तथाकथित कल्पनांमागे व मृगजळामागे पळतो आहे. परकीय जगतातल्या देखाव्यांनी भुलला आहे. स्वत:ची सारी बुद्धीशक्ती अपार पैसा व वस्तू गोळा करण्यात लावून त्यांच्या ढिगाऱ्यांना स्वत:ची समृद्धी व कर्तृत्व समजतो आहे. या साऱ्याचा त्याला नकळत मोठा अहंकारही आहे. म्हणून सृष्टीकडे जाऊन खरी समृद्धी शिकण्याची त्याची नम्र वृत्ती संपली आहे. अशा वेळी आपल्या तथाकथित कर्तृत्वाचा पट सृष्टीच्या विस्तृत, विलक्षण व अनाकलनीय विस्तारापुढे जरा मांडून पाहिला तर आपल्या छोट्या, पाचपन्नास वर्षांच्या आयुष्याचे ते कर्तृत्व, त्याचे कौतुक व अहंकार नक्की उतरेल. तसेच खरी समृद्धी कोणती व ती कशी मिळवावी हे शिकण्याची मनाची तयारी होऊ शकेल.

१. तळमळीचे शब्द

माझ्यातले नवल हे ,रे माणसा तू ।
श्रेष्ठत्व थोर तव हे नाहीच किंतू ।।
बुद्धीविवेक किति हे स्थलकालभान ।
कर्ता खरा तुज कळे तो देव कोण ।।

विध्वंस दुःख तरिही किति जीवनात ।
वाटे विषाद म्हणुनी हे शब्द येत ! ।।धृ।।

*

२. जरा ताडून पहा

कोठे कधी मम करा आरंभ झाला ।
विस्तार कोठवरि हा आहे पसरला ।।१ ।।
लागेल अंत कधि ना गवसेल माप ।
तू पाहशील जरि हे माझे स्वरूप ।।२ ।।

तू जातशी बुडुनिया तव कौतुकात ।
पाही किती उरत ते या आरशात ।।३ ।।

*

(३)

आपण स्वत:च्या प्रगतीचा कितीही भ्रम बाळगला तरी, आपल्या अंतर्यामी असलेली असुरक्षितता, भय, अनिश्चितता, अविश्वास, निष्प्रेम जीवन यांची कल्पना ज्याची त्याला असते. आपल्या जगण्यातला निखळ आनंद लोपला आहे हेही त्याला ठाऊक असते. यावरचा प्राथमिक उपाय म्हणजे मुख्यत: नि:स्वार्थ सेवा करणे हा आहे. सृष्टीत सतत अशी नि:स्वार्थ सेवा सुरू आहे. तिची चार सूत्रे आहेत – प्रत्येकाला देवस्वरूप मानणे, निरपेक्षता ठेवणे, सदैव प्रेमाने वागणे व सेवेत सातत्य ठेवणे. अशा पद्धतीने सृष्टी सदैव सेवा करते म्हणून ती तर आनंदित असतेच पण तिचे साधे सान्निध्यही माणसाला आनंदित, हलके करते.

(४)

सृष्टीतही कमीअधिक, उंचसखल, तरतम, स्थूलसूक्ष्म – असे सारे प्रकार आहेत. माणसातही तसे नैसर्गिकरित्या, संस्कारांमुळे, स्वभावठेवणींमुळे – असे प्रकार आहेत. पण सृष्टीतले पर्वत, टेकड्या, दऱ्याखोरी, वैराण माळ, सुपीक जमिनी – सारेच वेगवेगळे असूनही एकमेकांशी सुसंवादाने, संघर्षाविनाच नव्हे तर प्रेमाने राहातात. त्यांच्यात द्वेष, मत्सर, असूया, अकारण स्पर्धा – असले नकारात्मक भाव नाहीत. त्यातून माणूस काही शिकला तर द्वेषासारखे हानिकारक भाव, त्यापोटी होणाऱ्या व्यक्तिगत, सामाजिक अनिष्ट कृती व त्यांचे दुष्परिणाम टळू शकतील. फक्त त्यासाठी सृष्टीच्या या वेगवेगळ्या घटकांकडे मनापासून पाहिले पाहिजे व त्यांचा अभ्यास केला पाहिजे.

३. आनंद का नाही ?

कोठेहि जीव असु दे मी देव मानी ।
तो पर्वतावरि असो वा माळरानी ।।१ ।।
नसता मला कुठुनही मिळणार काही ।
प्रेमे तयास नित मी जगवीत राही ।।२ ।।

स्वार्थास जपत जगण्या तव जन्म जाई ।
सेवा नसे म्हणुनि रे आनंद नाही ! ।।३ ।।

*

४. द्वेषाशिवाय जगा

माझ्यात पर्वत किती त्या टेकड्याही ।
मैलोगणीक जमिनी खोरी दऱ्याही ।।१ ।।
ते तोलताल मिळुनी सांभाळतात ।
माझे स्वरूप सगळे प्रेमे राहात ।।२ ।।

तैसे कमी अधिक वा तुमच्यांत असते ।
द्वेषाशिवाय जगणे का शक्य नसते ? ।।३ ।।

*

(५)

माणसाची कर्मे तर जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंड चाललेली आहेत. ज्याने ही कर्मे करण्याची सारी क्षमता दिली आहे त्याची जाणीव ठेवून त्याला त्यांतली काही कर्मे अर्पण करणे हे माणसाचे आद्य कर्तव्य आहे. साऱ्या क्षमतांचा देव हा दाता आहे. माणूस हा दाता देव कोणत्याही स्वरूपात मानो – सगुणनिर्गुण देव, निसर्ग, माणसामाणसातला देव, पशुपक्षी–झाडपेड–दगडमाती यांतला देव इत्यादी – असा त्याचा कुठलाही देव असला तरी त्याला कृतज्ञतेने, मनापासून द्यावी अशी किती कर्मे माणूस त्याच्या एवढ्या हजारो कर्मांत करतो व प्रत्यक्ष देतो हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. त्याच वेळी हेही लक्षात घेण्यासारखे आहे की, सृष्टीत मात्र हे कर्मे करण्याचे व अर्पण करण्याचे काम सतत सुरू आहे.

(६)

मनुष्याला जगायला काही प्रमाणात तरी वस्तू–घरे–पैसा असा अनेक प्रकारे संचय करावा लागतो. तो गरजेचा असतो पण तो गरजेबाहेर कधी घडतो ते कळत नाही. मग मात्र अशा अतिरिक्त संचयाचा आधार वाटायला लागतो आणि अधिकाधिक संचय करावा अशी नकळत वृत्ती होते. त्यातच त्यासाठी भलेबुरे कुठलेही मार्ग अवलंबणे हेही योग्य वाटू लागते. परिणामी एकीकडे शोषण आणि दुसरीकडे तुटवडा व त्यापोटी क्षोभ निर्माण होतात. शिवाय माणसाचे खरे पोषण करणाऱ्या सृष्टिकर्त्याचे विस्मरण होते ते वेगळेच. म्हणून संचयातली मर्यादा वेळीच ओळखली तर रास्त संचय व अतिरिक्ताचे दान साधता येईल. तसेच अतिरिक्त संचयाने निर्माण होणाऱ्या अपप्रवृत्तीही टाळता येतील.

५. अर्पण करण्याजोगे काय ?

ज्याने मला घडविले नाना रुपात ।
त्याच्यात ये जड तसे चैतन्य येत ।।१ ।।
चैतन्यवर्ग करितो स्थूलास माया ।
माझी फुले उमलती देवास द्याया ! ।।२ ।।

हा स्थूल देह धरुनी करितोसि कर्मे ।
देण्यास योग्य किति रे देवास प्रेमे ? ।।३ ।।

*

६. अतिसंचयाने दु:ख होते

झाडांस वाढ करण्या दे ऊन वारा ।
माळावरीहि झरती मम प्रेमधारा ।।१ ।।
मी भूक देत, तरिही अन्नाहि देत ।
ज्याला तहान दिधली, जल त्यास देत ! ।।२ ।।

तुम्ही कशास भुलता अतिसंचयास ।
करता अकारण तुम्ही दु:खी स्वत:स ? ।।३ ।।

*

(७)

प्रत्येक मनुष्याच्या अंगी कुठले ना कुठले श्रेष्ठत्व–बुद्धी, सौंदर्य, शारीरिक बळ, सेवावृत्ती, स्मरणशक्ती, वक्तृत्व, गायन इत्यादी असते. ते जाणणारे मात्र त्याचा अहंकार बाळगतात व नुसतेच त्याचे लाभ उठवतात. यात अर्थातच मनुष्याचे श्रेष्ठत्व नाही. अंगच्या गुणांमुळे येणाऱ्या अहंकाराचा त्याग करून त्या गुणांचा किंवा श्रेष्ठत्वाचा लाभ इतरांना देण्यासाठी नदीसारखे प्रवाहीपणे जीवन जगणे आणि अंती त्या विश्वात्मक, ईश्वररूप सागराला मिळणे हे खरे मनुष्यत्व आहे. पण त्यासाठी स्वत:च्या क्षमतांची ओळख, त्यानुसार ध्येयाची निश्चिती, आवश्यक कृती, त्याला त्यागाची व सहनशीलतेची जोड, ध्येयप्राप्तीसाठी सातत्याने आच – तळमळ हे असावे लागते. हे सारे नदीकडून शिकता येते.

(८)

जगात समृद्धी नाही असे नाही. पैसा, नैसर्गिक साधनसंपत्ती, बौद्धिक–शारीरिक संपदा सर्वकाही आहे. फक्त ते काही ठिकाणी केंद्रित झाले आहे. त्यामुळे काही ठिकाणी समृद्धीचा ढीग, उधळमाधळ, अतिरेक आहे तर इतर अनेक ठिकाणी विपन्नता, दारिद्र्य, अभाव, दुर्भिक्ष व त्यामुळेच दु:ख हे आढळतात. ज्याच्याकडे हे साठले आहे – चालून आलेले असो, उपजत असो, कष्टार्जित असो कसेही असो त्याने ते स्वत:साठी वापरल्यावर तरी दुसऱ्यास पोचवले, सामाजिक जाणिवेने दिले तरच ही परिस्थिती पालटून सर्वांना सुखाची होऊ शकते. त्यासाठी स्वत: पाणी जमवून जगणाऱ्या पण ते परिश्रमपूर्वक शेंड्यापर्यंत पोचवून त्यालाही जगवणाऱ्या व तरीही अज्ञात राहणाऱ्या झाडाच्या मुळाकडून शिकावे.

७. नदीकाठी कोरडा

जन्मून पर्वतशिरी मम श्रेष्ठ स्थानी ।
निघते नदी स्वकुळ अन् घर ते त्यजोनी ।।१ ।।
साही विरोध, श्रम परि, दे जीवनास ।
नि:स्वार्थ जगुन मिळते ती सागरास ।।२।।

ना त्याग, ना कृति नसे, ना ध्येय, आच ।
काठी जगून मनुजा का कोरडाच ? ।।३।।

*

८. जगून जगवा

पाणी मुळे टिपुन ते खोडास देती ।
शेंड्यास पान तरि ते जल तेथ नेती ।।१।।
निर्लोभ मूळ किति ते नयना न दिसते ।
सृष्टी जगून जगवी आनंद देते ।।२।।

समृद्ध माणुस तरी दुसऱ्या न देई ।
लोभी, विपन्न अवघे दु:खात नेई ।।३।।

*

(९)

अनेक माणसांना जग सुधारण्याची मोठी हौस असते. ते स्वत: काही वेळा सुधारलेले, सद्‌गुणी असतात. असे असले तरी या हौसेने मात्र नुकसान होऊ शकते. त्यात बरेच लोक स्वत:चे दोष व अवगुण तसेच असताना इतरांना सुधारायला जातात, जगाचे भले करायला जातात – त्यातले नुकसान तर उघडच आहे. अशाच लोकांची संख्या जास्त दिसते. अशा लोकांना त्यातली स्वत:ची चूकही न कळल्याने जगाला मदत केल्याबद्दलचा अभिमानही अशांना वाटतो. या बाबतीत स्वत:च्या जागी राहून, स्वधर्म पाळून कार्य करणारे, फळेफुलेसावली देणारे वृक्ष, स्वत:चा मार्ग न सोडता जगाला जगवणाऱ्या नद्या आणि सूर्य – असे निसर्गाचे अनेक घटक आपल्याला बरेच काही शिकवू शकतात.

(१०)

माणसाच्या वाट्याला काही स्वभावगुण – त्रुटी – प्रकार जन्मत:च येतात. तशीच काही विशिष्ट परिस्थितीही जन्मत:च त्याच्या वाट्याला येते. सृष्टीतही भगवंत किती तरी प्रकारची बीजे टाकीत असतो. पण सृष्टी ज्याचे ते बीज आहे त्याचा त्याचा वृक्ष, फूल किंवा फळ म्हणून जो विकास करणे शक्य आहे तो ती करीत असते. तिची ना बीजाबद्दल तक्रार, ना विकासात कसूर. माणसालाही हे लक्षात घेऊन त्याच्या वाट्याला आलेल्या आंतरिक गुणांचे व बाह्य परिस्थितीचे उत्तमात उत्तम चीज करणे शक्य आहे. त्यामुळे एकीकडे परिस्थितीबद्दलच्या तक्रारी राहात नाहीत आणि दुसरीकडे कर्तव्यपूर्तीने सृष्टीसारखा तो आनंदितही राहू शकेल.

९. ठायीच स्वधर्म

एका स्थळी असुन जे कर्तव्यदक्ष ।
छाया फळे सुमनही देतात वृक्ष ।।१।।
चाले स्वमार्ग तरिही नदि देत सारे ।
तो सूर्य जीव जगवी आहे तिथुन रे ।।२।।

का हिंडतोस जगती करण्या भल्याचे ?।
ठायी स्वधर्म जगता हित हो जगाचे ! ।।३।।

*

१०. निरपेक्ष कर्तव्य

बीजे कुठून कसली देवोत देव ।
सांभाळ वाढ करिते ओतून जीव ।।१।।
जे जे जरूर पडते ते दे जिवास ।
येवोत पुष्प फळ वा काटे तयास ! ।।२।।

जे कार्य, माणुस, स्थिती वाट्यास येते ।
ती जाणुनी करित जा कर्तव्य ते ते ।।३।।

*

(११)

प्रत्येक गोष्टीच्या परिपक्वतेसाठी खूप कष्ट पडतात. ते एखाद्या गुणाबद्दल असेल, एखादे ध्येय गाठण्याबद्दल असेल. पण एकदा ही परिपक्वता गाठली की त्या कर्तृत्वाला फळ येऊन ते पूर्ण होते. अशा वेळी अनेकांना त्यासाठी घेतलेल्या कष्टांच्या जाणिवेमुळे ते फळ सोडवत नाही. तसेच ते फळ गाठल्याचा अभिमानही सोडवत नाही. यामुळे त्यांना व इतर संबंधित माणसांनाही संघर्ष, त्रास, दु:ख भोगावे लागते. अशा बाबतीत फळांफुलांवर अपार कष्ट घेऊन ती परिपक्व होताच सृष्टी मात्र ती दुसऱ्याला अर्पण करते, कुणी न नेल्यास निदान त्यांचा सहजतेने त्याग करते, हे अवश्य पहावे. हे केल्याने ती स्वत: सदैव आनंदात राहाते. माणसालाही या पद्धतीने जगून आनंदात राहाता येईल.

(१२)

माणूस अखंड कर्मे करीत असला तरी त्याची बरीचशी कर्मे स्वत:ला व स्वत:च्या जवळच्या माणसांना जगवण्यासाठी, सुखाच्या वस्तू–साधने गोळा करण्यासाठी असतात. काही भविष्याच्या चिंता दूर करण्यासाठी असतात, असे लक्षात येईल. वास्तविक मुळात आपण जगतो, घडतो त्या साऱ्यांत इतरांचा किती तरी मोठा वाटा असतो. अशा इतरांना जगवण्यासाठी, आनंद देण्यासाठी माणसाकडून किती कर्मे होतात याचा विचार करणे आवश्यक आहे. बऱ्याच लोकांच्या बाबतीत अशा दुसऱ्यांसाठी केलेल्या कर्मांचे प्रमाण किती तरी कमी, नगण्य आढळेल. वास्तविक आवश्यक त्या प्रमाणात दुसऱ्यांसाठी कर्मे करण्याने आपले कर्तव्यही पुरे होते व सृष्टीसारखा सर्वांच्या विकासाचा समतोलही साधला जातो.

११. फलत्याग

झाडे कितीक असती या भूमिवरती ।
कष्टा अपार करूनी मी वाढवी ती ।।१।।
पुष्पे फळे धरत मग घेते कुणी ते ।
कोणी जरी न नेता मी त्यागते ते ! ।।२।।

कर्तृत्व पूर्ण घडता अपुले न उरते ।
दिधल्या कुणा फळ खरा आनंद देते ! ।।३।।

*

१२. दुसऱ्यांसाठी कर्मे किती ?

भूमी जलात पुरवी सर्वांस माया ।
आभाळ होत धरिते सर्वांस छाया ।।१।।
मी तेजवायु पुरवी सर्वां जगाया ।
कर्मे अखंड करिते आनंद द्याया ! ।।२।।

पाही किती जगविशी दुसऱ्यास प्रेमे ।
दुसऱ्या जिवा जगविण्या किति होत कर्मे ? ।।३।।

*

(१३)

प्रत्येक माणूस आनंदाच्या शोधात आहे. त्यासाठी तो बाहेर धडपडतो आहे. पण खरा आनंद विशेष कुणाकडे दिसत नाही. सृष्टीत मात्र सर्वत्र आनंद पसरलेला दिसतो. इतकेच काय मनुष्य निसर्गाच्या सहज संपर्कात आला–साधी झुळूक जरी आली–तरी माणसाला आनंदित करण्याचे सामर्थ्य तिच्यात असते. या पार्श्वभूमीवर माणसाला स्वत:लाही आनंद नाही व दुसऱ्याला तो देण्याचे सामर्थ्यही नाही. सृष्टीत कुठेही खणले तर पाणी लागावे तसा स्वत:त खोल गेल्यास आत असलेला आनंदरूप भगवंताचा स्रोत–चैतन्य माणसाला दिसू शकते. पण माणूस त्याच्या बाहेरच्या शोधापुढे हे ना लक्षात घेत, ना शोधीत. तो ज्यावेळी अंतर्यामीच्या भगवंताकडे वळेल तेव्हा हा आनंद व तो देण्याचे सामर्थ्य त्याला गवसेल.

(१४)

सत्कार्य करण्यासाठी, सद्‌गुण मिळवण्यासाठी, टिकवण्यासाठी विशेष कष्ट पडतात. सृष्टीत अशा तऱ्हेचे कार्य प्रतिदिनी, सातत्याने चालू आहे. तरीही सृष्टीतले साधे फूलही स्वत:च्या सुगंधासारख्या कुठल्या सद्‌गुणाची, सत्कार्याची प्रौढीही मिरवीत नाही आणि प्रचारही करीत नाही. कदाचित वाऱ्याला ते काम करावे वाटले तर तो ते करतो. मनुष्य मात्र जरा काही कार्य केले, नुसता करणार असला तरी त्याच्या प्रसिद्धीच्या विवंचनेत असतो. यामुळे अनेकदा प्रसिद्धीची हाव लागते, उपाधी मागे लागतात, सत्कर्मांचे अहंकार होतात. त्यांत त्याचे स्वत:चेच नुकसान होते. म्हणून सत्कार्य करण्यासाठी कष्ट करावे, हे उत्तम. फुलासारखे पूर्ण व्हावे, सुगंध द्यावा पण वाऱ्यामागे लागू नये हे हिताचे ठरेल.

१३. आनंद जवळ आहे

भूमी सपाट असु दे की डोंगराळ ।
वा कोरडा दिसतसो विस्तीर्ण माळ ।।१।।
कोठेहि खोल खणता पाणी जिवंत ।
सर्वत्र साध्य वश तो भगवंत होत ! ।।२।।

का मानवा विसरशी, ना हाक देशी ।
सन्निध देव असुनी दुःखात असशी ? ।।३।।

*

१४. ना प्रौढी ना प्रचार

रंगांस घेउन किती पुष्पे उमलती ।
दैवी सुगंध सकळा ती देत जाती ।।१।।
ना सांगती कधि कुणा कोठे न फिरती ।
ज्या रंगगंध कळती ते धाव घेती ।।२।।

सत्कार्य सद्‌गुण सदा मिळवीत जावे ।
प्रौढी प्रचार कसले, तू का करावे ? ।।३।।

*

(१५)

अगदी नकळत्या, लहान वयातदेखील माणसाला प्रशंसेची ओढ आढळते. लहानपणी मुलाला चांगल्या कामाला प्रवृत्त करण्यापुरते ते ठीकही आहे. वाढत्या वयाबरोबर समज येऊन ही प्रशंसेची ओढ कमी होणे गरजेचे असते. पण प्रत्यक्षात मात्र ही प्रशंसेची आवड वाढीलाच लागलेली दिसते. अनेक प्रौढ माणसांनाही प्रशंसा आणि स्तुतीची आतून ओढ वाटते हे अपरिपक्वतेचे लक्षण होय. या ओढीमुळे अहंकार व अस्वास्थ्याला आमंत्रण होते. निसर्गात अनेक ठिकाणी चालू असलेली उत्तमात उत्तम कार्येसुद्धा कुठल्याही प्रशंसेच्या किंवा स्तुतीच्या अपेक्षेविना सुरू असतात आणि त्यामुळेच तेथे आनंदही असतो. यातून माणसाला चांगले काम करताना ठेवण्याच्या वृत्तीविषयी योग्य ते शिकता येईल.

(१६)

माणसाला हवे तर सगळेच असते. नको असतो तो त्यासाठी सोसावा लागणारा त्रास. त्यांतल्या त्यात स्वत:ला सुखाचे होण्यासाठी सोसावे लागणारे कष्ट, त्रास एक वेळ तो सोसताना दिसेल. पण इतर कुणासाठी त्रास सोसावा लागला की माणूस तक्रार करतो. वास्तविक जसे समूहामुळे लाभ वाट्याला येतात तसे समूहाचे त्रासही काही प्रमाणात वाट्याला येतात. दुसऱ्यांसाठी स्वतंत्रपणे काही त्रास सोसणे हेही अनेकदा कर्तव्य असते. कारण इतरांनीही आपल्यासाठी ते कर्तव्य केलेले असते. अशाने सर्वांचेच जीवनचक्र सुरळीत चालते. सृष्टीतले घटकही सृष्टीचे सारे चक्र चालण्यासाठी अनेकदा त्रास सोसताना दिसतात. त्या सोशीकतेतून माणसाला शिकता येईल.

१५. परिपक्वता

या टेकडीवरि जरा ये तू चढूनी ।
पाही इथे फुलत जे, पाही न कोणी ।।१।।
वाराहि वाहत उन्हे पडतात येथे ।
पाही न कौतुक करी कोणी न जेथे ।।२।।

मनुजा तुला किति हवी स्तुति वा प्रशंसा ।
परिपक्व तू असुन रे भगवंत–अंशा ।।३।।

*

१६. सृष्टिचक्राचे मर्म

सोशीत पर्वत उभे या ऊष्ण ज्वाळा ।
झाडे उभी कितिक या सोशीत धारा ।।१।।
सोशीत सृष्टि अवघी अति थंड वारे ।
हे सृष्टिचक्र फिरण्या सोशीत सारे ।।२।।

अस्वस्थ किंचित तुला कधि त्रास होता ।
करण्यात सहन सगळे ये मर्म हाता ! ।।३ ।।

*

(१७)

सृष्टीतले लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे पूर्णतेचा–उत्कृष्टतेचा तिला असलेला ध्यास हे दिसून येईल. एखाद्या बीजापासून नुसताच वृक्ष निर्माण होईल, एखाद्यापासून पानेफुले येतील, एखाद्यापासून फळे येतील. पण ते जसे येणार असेल तसे ते पूर्णपणे विकसित करण्याचा ध्यास सृष्टीत आढळून येतो. माणसामाणसाच्या कुवतीत, प्रकारात विविधता असली तरी त्या त्या कुवतीनुसार, प्रकारानुसार उत्कृष्ट–पूर्ण होणे हे मात्र सर्वांचेच सारखे ध्येय असू शकते. माणूस मात्र ते ध्येय गाठण्याचे तर सोडाच पण कुवतीबद्दल तक्रारी करीत, 'त्याला काय होते' म्हणून निकृष्ट कर्महीं स्वीकारतो, हे मानवी क्षमतेला खरे तर कमीपणाचे आहे. सृष्टीकडे पाहून आपणही पूर्णतेचा–उत्कृष्टतेचा ध्यास घेतला तरी पुरे.

(१८)

माणूस दगडाला निर्जीव, अचेत, गुणहीन पदार्थ समजतो हेच मुळात माणसाची जाण कमी पडण्याचे लक्षण होय. तरीही असा हा कुठेही खाणीत पडून असलेला दगडसुद्धा मूर्तिकाराने दिलेले घाव सोसून, त्याला सहकार्य करून एका चैतन्यमय देवतेत रूपांतरित होऊ शकतो. माणूस तर स्वत: चैतन्यमयच आहे. त्याच्याजवळ क्षमताही खूप आहेत. तो भगवंत–अंश आहे. त्यातून त्याने अंतरंगाने देव बनावे म्हणून परमेश्वर स्वत: मूर्तिकार होऊन वेगवेगळ्या आघातांतून त्याला घडवण्याचा प्रयत्न करीत असतो. हे अंतरंगबदलाचे घाव समजून घेऊन, सोसून व स्वत:ला बदलून परमेश्वराला सहकार्य करण्यात माणसाचा अंतरंगाने देव घडून माणसाचे स्वत:चेच कल्याण होत असते, हे त्याने लक्षात घ्यावे.

१७. उत्कृष्टतेचा ध्यास

झाडे असोत झुडुपे वेली असोत ।
पूर्णात पूर्ण घडण्या करतात कष्ट ।।१।।
उंचात उंच बनण्या वरि धाव घेती ।
जे पान, फूल, फळ, ते उत्कृष्ट देती ।।२।।

रे चालते तुज कसे निकृष्ट कर्म ?।
उत्कृष्टता असुनही सृष्टीत धर्म ! ।।३।।

*

१८. देव होई

दगडात येथ कुठले चैतन्य नाही ।
खाणीत भूमिवरती पडुनीच राही ।।१।।
सोशी कधी कुणि तया जे घाव देई ।
त्यातून चेतन पहा तो देव होई ।।२।।

तू श्रेष्ठ, त्यात तुजला घडवीत देव ।
का देव तू न होशी ? बदली स्वभाव ! ।।३।।

*

(१९)

जन्मल्यापासून माणूस सृष्टीकडून, इतर माणसांकडून, संस्थांकडून, शास्त्यांकडून, संस्कृतींकडून अविरतपणे असंख्य गोष्टी घेतो आहे. त्यामुळे त्याचे शिक्षण, पोषण, संवर्धन, प्रगती अशा अनेक गोष्टी त्याच्या आयुष्यात घडून येतात. या साऱ्याची जाण ठेवून प्रत्यक्ष कृतींद्वारे हे ऋण फेडण्याचे त्याचे कर्तव्य आहे. ते कसे फेडावे, कुणाला काय शक्य आहे हे कदाचित वेगवेगळे असेल पण सृष्टीतील घटकांप्रमाणेच कुठल्या ना कुठल्या रूपात या कृतज्ञतेच्या कृती आपल्याकडून किती घडतात हे प्रत्येकाने काळजीपूर्वक पाहिले तर स्वत:चे जीवनही योग्य घडेल, साऱ्या समाजाचेही योग्य घडेल तसेच सृष्टीची एकूण समृद्धीही टिकून राहील.

(२०)

अलीकडे विविध कारणांनी माणसांना अनेकदा नैराश्य येताना दिसते. त्यांतली अनेक माणसे नैराश्यापोटी आत्मविघातक व समाजविघातक कृत्येही करताना दिसतात. त्यात साधे मनासारखे न होण्यापासून ते अपयश, अपेक्षाभंग, मृत्यू येथपर्यंत अनेक कारणांमुळे हे नैराश्य येताना दिसते. निसर्गात मात्र वादळे, वणवे, खवळलेले समुद्र, मृत्यूचे तांडव अशा अनेक प्रसंगांना सामोरी जाणारी सृष्टी रोज नवी सकाळ घेऊन नव्या जीवनाच्या स्वागताला किती उमेदीने व सहजतेने जात असते हे अनुभवण्याची गरज आहे. मग माणसाला आपले दु:ख अंतिम नव्हे, ते आपल्याच चुकीच्या कर्मांचे फळ असते, काही सामूहिक प्रारब्धे असतात – अशा अनेक विवेकी दृष्टींनी घटनांकडे पाहाता येईल, नैराश्य टळेल, उमेदही वाढेल.

१९. शोधूनि पाहे

दे सागरास फिरुनी आभाळ पाणी ।
जमिनीस वृक्ष शमवी छाया धरोनी ।।१।।
पुष्पे सुगंध फिरूनी सृष्टीस देती ।
घेती जरी सकळ हे परतोनि देती ।।२।।

रे मानवा, प्रतिदिनी घेतोसि आहे ।
देशी फिरून किति ते शोधूनि पाहे ! ।।३।।

*

२०. नवजीवनाची उमेद

येवोत वादळ कधी खवळो समुद्र ।
वणव्यात तांडव करो कधि मृत्यु रुद्र ।।१।।
नेमे सकाळ फिरुनी करि स्वागतास ।
येथे उमेद सकळा नवजीवनास ।।२।।

रे तू किती विवेकी ते तूच पाही ।
नैराश्य, मरगळ तुझ्या का जीवनी ही ? ।।३।।

*

(२१)

तशी सर्व अस्तित्व ही एकच व जोडलेली गोष्ट आहे. आपणच जडचेतन, पशुपक्षी, माणसे असे भेद स्थूलदृष्टीने करतो. सृष्टीत असे भेद नाहीत. सर्व पदार्थांची घटना मूलत: सारखी व जोडलेली आहे हे आता विज्ञानाच्या समोरही येऊ लागले आहे. चेतनेने सर्व जोडलेले आहे. आपण दुसऱ्याशी जोडलेले आहोत हे लक्षात आले तर मग आपोआपच एकमेकांच्या अडीअडचणींचा, सुखदु:खांचा विचार घडतो, सहानुभूती वाटते, कृती घडते. त्यामुळे सर्वांच्याच स्वास्थ्याची व्यवस्था लागते. हे तत्त्व लक्षात आले तर चेतनच काय पण अचेतन सृष्टीचे हितही माणसाकडून घडेल. श्रेष्ठ घटक म्हणून तेवढे अपेक्षितही आहे. माणसाने सुरुवातीस निदान आपण इतर माणसांशी जोडलेले आहोत एवढे लक्षात ठेवले तरी पुरे.

(२२)

प्रत्येक मनुष्याला जगात काही विशिष्ट स्थान आहे, कर्तव्य आहे, ध्येय आहे, ते गाठण्यासाठी काही गतीही आहे. सृष्टीतला माणूस हा सर्वांत श्रेष्ठ घटक असल्याने त्याने सारे समजून घेऊन, त्याप्रमाणे वागून आनंदाचे, ईश्वरत्वाचे उत्तम ध्येय गाठावे हा आदर्शप्रवास आहे. या प्रवासात त्याला प्रसंगानुरूप कधी कुणाच्या जवळ राहावे लागते तर कधी दूर. दोन्हींतही त्याचे हितच असते. पण स्वत: होऊन रेंगाळणे, लोभाने जवळ वा दूर जाणे हे मात्र त्याच्या प्रवासात अडचणीचे ठरते. सृष्टीतले ग्रह–तारे–पाणी आपापले कर्तव्य करून आपल्या ध्येयाकडे जसे गतिशील होतात तसे त्यानेही स्वत:चे कर्तव्य करून गतिशील राहायचे ठरवले तर त्यात सार्थक त्याचे स्वत:चे व सृष्टिव्यापाराचेही.

२१. सर्व जोडलेले

दिसते कुणी जड तसे काही सचेत ।
कोणी म्हणोत असती माझ्यात भेद ।।१।।
दुःखासुखात जड चेतन जोडले रे ।
अस्तित्व एक सगळे हे जाण तू रे ।।२।।

तू माणसास तरि रे जोडून राही ।
ही सृष्टि एक सगळी ध्यानात घेई ! ।।३।।

*

२२. अंतर, कर्तव्य व गती

तो सूर्य थोर जगवी जगि सर्व जीवा ।
पाणी जमीन करिती उपकार सर्वा ।।१।।
तारे कितीक ग्रह हे भ्रमणी रहात ।
राखून तोल जपती नित अंतरास ।।२।।

दूरस्थ निकट तुज रे लागे रहावे ।
कर्तव्य नित्य करुनी गतिशील व्हावे ! ।।३।।

*

(२३)

माणसाने स्वत:च्या बुद्धीने कामकाजाच्या सोयीसाठी वेगवेगळी यंत्रे बनवली आहेत. ती त्याने ठरवल्यानुसार तशीच्या तशी वर्षानुवर्षे चालू राहतात. याचे एका बाजूने कौतुक असले तरी माणसात व यंत्रात फरक आहे. माणसाजवळ प्रतिभा आहे, समयसूचकता आहे, सहानुभूती आहे, चांगल्या अर्थाने अतर्क्यपणे वागण्याची क्षमता आहे, नावीन्याची ओढ आहे. पण यंत्रयुगाच्या ताब्यात गेलेला माणूस या साऱ्याला व त्यामुळे मिळणाऱ्या आनंदाला पारखा झाला आहे. तोही यंत्रवत एक ठरीव, कोरडे, भावहीन जीवन जगू लागला आहे. माणसाला पुन्हा आनंदमय जीवनाकडे जायचे असेल तर त्याला निसर्गाकडून विविधता, नवता, संजीवकता यांचा उपलब्ध असलेला वारसा जागा करून घ्यावा लागेल.

(२४)

आज घरातल्या दोन माणसांत संवाद तर कमीच उलट बोलणे, संबंधसुद्धा गरजेपुरते ठेवण्याकडे कल झाला आहे. त्यामुळे प्रत्येकाची सुखदु:खेही त्याच्या स्वत:पुरती राहतात. त्यामुळे दु:खात मदत नाही व सुखात साथीदार नाही. वास्तविक मनुष्याला समृद्ध भावजीवन व संवादाची उत्कृष्ट क्षमता आहे. सृष्टीत मोराचे नर्तन, पशुपक्ष्यांचे आवाज, गायीच्या नेत्रांत करुणा आहे. पर्वत, कडे, झाडे यांचे ध्यानस्थ बसणे हेही स्वत:शी संवाद साधणेच आहे. वेलीसारखी छोटीशी निर्मितीही फुलांच्या ज्योती उजळून सृष्टिनिर्मात्याची आरती करून त्याच्याशी सुसंवाद साधते आहे. अशा वेळी माणसाने जागे होऊन स्वत:शी, इतरांशी आणि सर्व सृष्टीशी संवाद साधणे त्याला स्वत:लाच आनंद देणारे ठरेल.

२३. वैविध्य आणि नवता

माझ्यात फूल अवघे बनते नवीन ।
पानात रेष रचिते प्रतिभा जपून ।।१।।
झाडासमान न करी मी झाड दुसरे ।
वैविध्य आणि नवता मम जीवनी रे ।।२।।

ते ते ठरीव जगशी, तू बद्ध होशी ।
आनंद ना उरतसे, का यंत्र होशी ? ।।३।।

*

२४. संवाद व आनंद

मोरांत नर्तन असे, पशु मंत्र गाती ।
ध्यानस्थ पर्वत, कडे, झाडेहि होती ।।१।।
पुष्पांत आरति करी बघ वेलमाय ।
करुणाष्टके म्हणतसे नेत्रांत गाय ।।२।।

संवाद सर्व करिती तू दूर का रे ? ।
आनंद सृष्टिमधला जाणून घे रे ।।३।।

*

(२५)

एखादा नवा संबंध माणसाच्या आयुष्यात आला की, तो सुरुवातीला त्या संबंधाची काळजी करताना दिसतो. तो टिकावा, वाढावा म्हणून माणूस स्वत:च्या स्वार्थाला आळा घालतो, दुसऱ्याचे मनोगत–विचार–काम जाणून घेतो, त्यानुसार वागण्याची काळजी घेतो. पण हा संबंध जुना झाला की तो त्याची जपणूक करणे विसरून जातो. हे फक्त माणसांपुरतेच असते असे नाही तर घरदार, झाडे, पशुपक्षी – अशा अनेक संबंधांच्या बाबतीतही हे घडते. ते संबंध, त्यांची मते, त्यांचे फायदे, त्या व्यक्ती माणूस गृहीत धरतो. मग मात्र अपेक्षाभंग व दु:ख वाट्याला येते. खरे तर प्रत्येक संबंध हा एखाद्या रोपट्याची काळजी घ्यावी तसा रोज नवीन समजून, काळजी घेण्यासारखा मानला तर आनंदमय होतो.

(२६)

स्वत:च्या ठिकाणी निर्भेळ चैतन्यरूपाने विद्यमान असलेल्या भगवंताची भेट, सान्निध्य हा माणसाचा खऱ्या आनंदाचा कधी न आटणारा झरा आहे. त्याशिवाय निसर्गाचा अभ्यासपूर्ण सहवास, जगण्यातली सहजता, निर्मळता, सर्जनशीलता, निष्कपट प्रेम, ईशकृपेचा अनुभव असेही किती तरी खऱ्या आनंदाचे न आटणारे झरे माणसाजवळ आहेत. पण या मार्गांची ओळख, अभ्यास,अनुभव नसल्याने माणूस आनंदासाठी खाणेपिणे,कपडेलत्ते, हिंडणे, प्रसिद्धी, करमणुकीची टीव्ही–संगणकखेळ अशी कृत्रिम साधने यांच्यामागे लागतो. एक तर त्या खोट्या आनंदात राहातो नाही तर कंटाळून असली साधने बदलीत राहतो. अशा वेळी निसर्गाकडे पाहून माणसाने खरे आनंद शोधावेत व मिळवावेत.

(२७)

मोठ्या आशेने,विश्वासाने आकाराला आलेली ही –मनुष्यरूप– निर्मिती भगवंताच्या कृपेची सर्वांत मोठी धनी आहे. सृष्टीत तिचे स्थान आकाराने एखाद्या अंशाएवढेच असले तरी क्षमतेने अवघ्या सृष्टीचेच नव्हे तर सृष्टिकर्त्याचेही गूढ उकलण्याचे, त्याचा अनुभव घेण्याचे आणि सर्वांत प्रगल्भतेने जगण्याचे सामर्थ्य या माणसामध्ये आहे. पण भगवंताची ही सारी देणगी विसरून, न वापरून, वेळी चुकीच्या ठिकाणी वापरून जगताना त्याला पाहिले तर कुणाही विचारी माणसाला खंत वाटेल, सृष्टीला, सृष्टिकर्त्याला तर वाटेलच. माणूस अंतिमत: त्याने दु:खी होईलच होईल. निदान सृष्टीतली प्रात्यक्षिके पाहून तरी माणसाने आपली जीवनपद्धती आदर्श बनवावी यासाठी हे नम्र आवाहन व शब्दांकन आहे.

२५. रोजची जपणूक

बागेत झाड उगवो वा माळरानी ।
पक्षी असोत इवले वा सिंह कोणी ।।१।।
जगण्यास सर्व पुरवी जपणूक रोज ।
जैसा नवीन जुळला संबंध आज ! ।।२।।

तू काळजी करित का तव माणसांची ।
संबंध आज जुळला समजून त्यांची ? ।।३।।

*

२६. कृत्रिम आनंद नको

येथे असो दगड वा पाचू कुठेही ।
सगळे खरे विमल हे, नकली न काही ।।१।।
आनंद, सर्जन इथे पाही कुठेही ।
निर्मूल्य प्रेम इथले प्रभुची कृपा ही ।।२।।

आनंद कृत्रिम किती का तू मिळविशी ? ।
आनंदरूप असता मी तूजपाशी ! ।।३।।

*

२७. नम्र आस

शिकण्यास सर्व दिधले सर्वेश्वराने ।
सृष्टीत मांडुन किती मोठ्या मनाने ।।१।।
संदेश – स्पंदन सदा सृष्टीत होई ।
जे अल्पबुद्धि शिकले ते दीन देई ।।२।।

कर्त्यास प्रार्थित तसे अन् माणसास ।
न्यूनाधिका क्षमावे ही नम्र आस ।।३।।

*

सृष्टीची आरती

माणूस हा निसर्गाचा एक अविभाज्य घटक आहे. माणसाच्या आकाराला येण्यापासून त्याच्या निराकारात विलीन होण्यापर्यंत साऱ्याला कारण असणारी , साक्षी असणारी सृष्टी ही त्याची एक फार थोर अशी मायच आहे. ती माणसाचीच नव्हे तर दगडधोंडे, नद्यानाले, सागर – महासागर, डोंगरदऱ्या, असंख्य वनस्पती, हवापाणीअग्नी अशा अक्षरशः अगणित गोष्टींचीही माय आहे. तिची स्वतःची आकाराला येण्याची, आकाराला आलेलं चालवणं – जगवणं – वाचवणं – नष्ट करणं – एकमेकांना पूरक विनाशक करणं यांची – एक विशाल पण सूत्रबद्ध रचना आहे. तिच्यातून, या साऱ्या सृष्टीच्या व्यापारातून मूळ प्रेरक ईश्वरी व्यवस्था, कार्यपद्धती यांचं दर्शन तर माणसाला होतंच पण अधिकाधिक आदर्श, ईश्वरी जीवन कसं जगावं याचे अनेक संदेश आणि वस्तुपाठही माणसाला मिळतात. असे वेचक वस्तुपाठ देणाऱ्या सृष्टिसंदेश या सत्तावीस पदांच्या अखेरीस आलेली ही सृष्टीची आरती तिथं समर्पक आहेच पण एक स्वतंत्र आरती म्हणूनही प्रत्येकाच्या उपयोगी पडणारी, त्याला जागृत करणारी, सृष्टी शी संवाद संवाद साधून बोध घ्यायला प्रवृत्त करणारी आहे.

*

सृष्टीमाय तुजला आम्ही ओवाळू आरती । तुजला ओवाळू आरती ।
संदेशांचे चिंतन घडण्या देई शुद्ध मती ।।धृ ।।

सूक्ष्मरूप तो देव तुझ्यातुन प्रगटे या जगती । वाटे प्रगटे या जगती ।
पर्वत झाडे वेली पुष्पे मनोगते गाती ।।
रुजोत त्यातिल अधोरेखिते जनीमनीचित्ती । अमुच्या जनीमनीचित्ती ।
संदेशांचे चिंतन घडण्या देई शुद्ध मती ।।१।।

निसर्ग तू तो, तूच प्रकृती एकरूप होशी । अवघे एकरूप होशी ।
तुजला कळते वळते ते ते कळु दे आम्हांसी ।।
संवादातुन बोध घेउनी होऊ दे प्रगती । आमुची होऊ दे प्रगती ।
संदेशांचे चिंतन घडण्या देई शुद्ध मती ।।२।।

*

* ३. उपासनामाला *

१. ऋणस्मरणमाला

(लहानथोर सर्वांना उपासनेत, शालेय वा अन्य ठिकाणी म्हणण्यासाठी)

मातापिता स्वजन अन् परिवार सारा ।
ज्यांनी जिवास दिधला जगती निवारा ।
बुद्धी विचार स्वर अक्षर दिव्य धारा ।
राहो सदैव स्मरणी उपकार सारा ।।१।।

आजन्म साथ करुनी जगवी जनांस ।
देणे सदैव किति हे, अवघ्या जिवांस ।
त्या सृष्टिचे ऋण फिटे, कधि का कुणास ।
आहे सदैव स्मरणे, मज पामरास ।।२।।

हातात बोट धरुनी, अवघ्या गुरूंनी ।
विद्या असंख्य दिधल्या, जगण्यास ज्यांनी ।
नेले तरून मजला मम सद्गुरूंनी ।
कर्तव्य रोज घडु दे, सकळा स्मरूनी ।।३।।

ज्यांनी जगून जपले, जगि ईश्वरास ।
शास्त्रे असंख्य रचिली, जपले कलांस ।
मूल्ये अमूल्य दिधली जगण्या जगास ।
त्यांचे सदैव ऋण हे मज पामरास ।।४।।

शास्ते असोत जन वा कुणि राजसत्ता ।
संस्था कितीक जपती जगती व्यवस्था ।
त्याही पुढे असत जो अवघ्यांस त्राता ।
आहे हरेक स्मरणे उपकारकर्ता ।।५।।

आलो कशास जगती, जगणे कशास ।
कर्तव्य काय कुठले, कळु दे मनास ।
धैर्ये जगून मरणे, मिळणे प्रभूस ।
दीना सदैव धरणे, मनि हाच ध्यास ।।६।।

।। श्रीराम ।।

*

* ४. सममंत्र *

श्री गणेशपूजन मंत्र व सममंत्र

श्री गणेशाय नम: ।।
श्री सरस्वत्यै नम: ।।
श्री सद्‌गुरवे नम: ।।

देववाणीस नमुनी, मराठी मंत्र हे दिले ।
शारदा प्रेरणेने जे, कळण्या करण्या भले ।।
उपचार करणे म्हणणे, व्हावे सुलभ त्यातुन ।
दक्षिणा मात्र वेदज्ञा, देणे आदरपूर्वक ।।

शुचिर्भूतपणे बसुनी देवासन्मुख आसनी ।
उच्चार करणे आता कृतीची जोड देउनी ।।

प्रार्थना हे गणेशा तुज, भावे वंदन मी करी ।
विघ्ने सर्व हरूनिया, नेई कार्यास सिद्धिला ।।

सुपारीच्या गणेशाला, पूजा उपचार अर्पिणे ।
खोबरे गूळ नैवेद्य, दाखविणे नमनासह ।।

।।श्रीराम।।

ओंकारात खरा एक, तोच विष्णु सहस्रश: ।
नामे चोवीस ती त्याची स्मरणे नमुन नित्यश: ।।

पळीत घेउनी पाणी पिणे ते स्मरणपूर्वक ।
आचमन हाच आरंभ पूजेचा शुभकारक ।।

केशवा पहिले नमन दुसरे नारायणास ते ।
माधवा तिसरे नमन गोविंदा चवथे असे ।।
विष्णूस पाचवे नमन सहावे मधुसूदना ।
सातवे त्रिविक्रमाला ते, आठवे नमन वामना ।।
नववे श्रीधरा नमन हृषीकेशास दशम ते ।
पद्मनाभास अकरावे दामोदर नमू मने ।।
संकर्षणास तेरावे चौदावे वासुदेव हे ।
पंधरावे नमन प्रद्युम्ना सोळावे अनिरुद्ध हे ।।
पुरुषोत्तम सतरावे हे अठरावे श्री अधोक्षजा ।
नारसिंहास नमन विसावे अच्युतास हे ।।
जनार्दन एकवीसावे बाविसावे उपेन्द्र हे ।
तेविसावे नमू हर हे श्रीकृष्णाय नमो नम: ।।

प्राणायाम करू नंतर घेऊ हातात अक्षता ।
समजुनी म्हणुया मंत्र पूजासंकल्प सोडता ।।

महागणपतिस्मरण, श्रीगुरूंचे तसे करू ।
सरस्वती, वेद, वेदपुरुष, इष्टदेव नमू तसे ।।

कुलदेवता स्थानदेव, तशी ती वास्तुदेवता ।
शचीपुरन्दर आदिक या, नमुया सर्वदेवता ।।
उमामहेश्वरांस नमन, आईवडिलही नमू ।
कालकामपरशुराम सर्व देव तसे नमू ।।
नमुया ब्रह्मवृंदांस निर्विघ्न सर्व हे असो ।।

सुमुख-एकदन्त अन्, कपिल गजकर्णक ।
लम्बोदर तसा विकट, विघ्ननाशक, गणाधिप ।।
धूम्रकेतु, गणाध्यक्ष, भालचंद्र, गजानन ।
बारा पवित्र नामे ही, म्हणे जो ऐकतो तसा ।।
विद्यारंभ, विवाहात, येता, जाता कुठे कसा ।
संग्रामी, संकटी त्याला, विघ्न ना येतसे कधी ।।
।।श्रीराम।।

इतुका मंगलाचरण संक्षिप्त करुनी अता ।
उच्चारू आज दिवसाची जी जी शक्य विशेषता ।।

शालिवाहन शकातील शुभ संवत्सर हे असे ।
दक्षिणायन, ऋतु वर्षा, भाद्रपद शुद्ध पक्ष हा ।।
त्यातील चतुर्थी तिथि चे, शुभ नक्षत्र योग जे ।
करण, वार यांचाही, उच्चार करणे इथे ।।
ऐशा गुणविशेषांची तिथी ही शुभकारक ।
स्मरुनी संकल्प करुया आता कल्याणकारक ।।

माझ्या तशा कुटुम्बाच्या परिवाराच्या तशाच त्या ।
आरोग्यक्षेम स्थैयार्थ शान्तिऐश्वर्य वाढण्या ।।
घडण्या मंगल सर्वांचे होण्यास प्रगती तशी ।
श्रुतिस्मृतिपुराणात दिलेले फल साधण्या ।।
मातृभाषेत संक्षिप्त, मंत्रांसह करु पूजन ।
श्री मृण्मय गणेशाचे भावे उपचारपूर्वक ।।

एवढे स्मरुनी सारे अक्षतांसहित जल तसे ।
ताम्हनात तसे सोडू, पूर्ण संकल्प जाहला ।।

।।श्रीराम ।।

आता मृण्मय गणेशात प्राणांची स्थापना करू ।
आकारा मूर्ति येण्याच्या क्रियांचे स्मरण ते करू ।।
त्यासवे अक्षरे दिव्य काही उच्चारणे तशी ।
भरती ती प्राण मातीत सजीव करित मूर्तिला ।।

।।श्रीराम ।।

हेरंब स्मरणामध्ये माती आणून भिजवणे ।
सुमुखाचे नाम घेऊनी मूर्ती ही शुद्ध घडविणे ।।
गौरीसुतास नमुनी मूर्तीची स्थापना करू ।
मंत्रांनी मूर्तिच्या मध्ये, प्राण आता असे भरू ।।
ब्रह्माविष्णुमहेश्वर हे, मंत्रांचे ऋषि होत या ।
चतुर्वेद असे छंद, क्रियामय शरीर हे ।।

प्राण ही देवता येथे आं हे बीज इथे असे ।
ऱ्हीं शक्ति क्रौं कीलक ही प्राणांची स्थापना असे ।।

आता जशी दिली येथे उच्चारी अक्षरे तशी ।
प्राणावाहन होण्यास तीन वार क्रमे तशी ।।

ॐ आं ऱ्हीं क्रों अं यं रं लं वं शं षं सं हं ळं क्षं ।
उच्चारणे इथे येवो, प्राण मूर्तीत स्थिर असो ।।
ॐ आं ऱ्हीं क्रों अं यं रं लं वं शं षं सं हं ळं क्षं ।
उच्चारणे इथे येवो, जीव मूर्तीत मृण्मय ।।
ॐ आं ऱ्हीं क्रों अं यं रं लं वं शं षं सं हं ळं क्षं ।
तिसऱ्या उच्चारणे आता, येवो मूर्तीत सर्वही ।।
वाचा इंद्रिये डोळे, कान आणिक जीभ ती ।
घ्राणेंद्रिय तसे अवयव, हातपायादि येउ दे ।।
सुखाने सर्व येऊन, येथे नांदोत सर्वदा ।
देहव्यापार होवोत, देवो घेवोत शुभ सदा ।।
प्राण संचारता मूर्ती, झाली स्थिर सजीव ही ।
पंधरा संस्कार होण्यास पंधरा ओंकार म्हणु अता ।।

आता न हलविणे मूर्ती, पायाशी वाहू अक्षता ।
सजीव गणपती आता पूजेची होय सिद्धता ।।

।।श्रीराम।।

प्रथम नमन ते कलशा, मुखी विष्णु वसे जया ।
कंठी रुद्र, तळी ब्रह्मा, मातृगण आत राहती ।।

कडेला सर्व समुद्र, सप्तद्वीप वसुंधरा ।
ऋग्वेद अन् यजुर्वेद, सामवेद, अथर्व ही ।।
यथासांग इथे वसती, गायत्रीही तशी वसे ।
सावित्री शांति देवोत, पुष्टी पाण्यात या असे ।।
पापहारिणी गंगा, तशी यमुना सरस्वती ।
नर्मदा, सिन्धु, कावेरी, गोदावरि तशी वसो ।।
येवोत देवपूजार्थ, कलशामध्ये वसोत त्या ।

पूजा गंधफुले वाहुन, कलशाची करणे तया ।।
घंटेची करणे पुजा, घंटा वाजविणे जरा ।
आवाहन सर्व देवा, असे जे मानिले असे ।।
पाणी पवित्र कलशातिल, घेउनी पुढिल पूजना ।
फुलाने शिंपडावे मग, पूजासाहित्य स्वत:सह ।।
आता ध्यान गणेशाचे हाती घेउनी अक्षता ।

एकदंत, शूर्पकर्ण, गजवक्त्र, चतुर्भुज ।।
ध्यावा प्रसन्नवदन, मने सिद्धिविनायक ।

पहिला उपचार म्हणुनी अक्षता वाहणे तया ।।

आवाहन गणेशाचे सुरराजार्चितेश्वर ।
अनाथनाथा, सर्वज्ञा, पूजेला गणनायका ।।
येई विनायका येथे, म्हणुनी आवाहितो तुला ।

आवाहनार्थ देवाला वाहणे, अक्षता पुन्हा ।।

नानारत्न अलंकारे, दिव्य आसन भूषित ।
मांडिले हे सुवर्णाचे, घ्यावे सिद्धिविनायका ।।

म्हणुनी आसना मूर्तीच्या, करावा स्पर्श किंचित ।
अक्षता वाहणे थोड्या आसनार्थ म्हणूनिया ।।

सर्वतीर्थांतुनी आले पाद्य चंदनयुक्त हे ।
फुलाने वाहतो पायी, स्वीकारी भक्तवत्सला ।।
गंधपुष्प तसे पाणी, अक्षतांसह अर्घ्य हे ।
गणाध्यक्षा नमो तुजला, स्वीकारी करुणानिधे ।।

एकत्र करुनी तूप, दही, मध, पळीमध्ये ।
मधुपर्कस्नान स्वीकारा, सर्वलोकेश गणपती ।।

विनायका नमू तुजला त्रिदशैरभिवंदित ।
गंगोदक स्वीकारा पाणी आचमनीय हे ।।
तूप दूध दही साखर, मध हे पायि वाहतो ।
फुलाने पंचामृतस्नान स्वीकारा गणनायका ।।
स्नानानंतर शुद्धोदक फुलाने घालणे जरा ।
मग गंधपुष्प इत्यादी साधीशी करणे पुजा ।।
विडा फळावरी पाणी सोडणे अर्पिण्यास ती ।
ठेवणे मग फुले काढुन, निर्माल्य उत्तरेकडे ।।

आता महाभिषेकार्थ, अथर्वशीर्ष वाचणे ।
म्हणणे वा पुरुषसूक्त तसा संकल्प सोडणे ।।

महाभिषेक स्वीकारा देवा सिद्धिविनायका ।
स्नानानंतर आचमन, फुलाने पाणि द्या जरा ।।

रक्तवस्त्रे दोन दिव्य अर्पितो श्री विनायका ।
सर्वप्रदा घेई ती, लंबोदर हरात्मजा ।।
ब्रह्मसूत्र सुवर्णाचे यज्ञोपवित आणिले ।
उत्तरीय म्हणुनी घ्यावे, भक्तांना वर द्या भला ।।

कस्तुरीयुक्त हे चंदन केशरहि त्यात घातले ।
विलेपना सुरश्रेष्ठा घ्यावे चंदन हे भले ।।
द्विरदानना गणेशा या, आणिल्या लाल अक्षता ।
भाळीच्या चंद्रम्यावरती धारण करण्या गजानना ।।

शेंदूर हळदीकुंकू बुक्का अत्तर भूषणे ।
फुले, कमळे, पत्री, केवडा, तुळस वाहणे ।।

गणाधिपा नमू तुजला, उमापुत्रघनाशना ।
एकदंता इभवक्त्राला, मूषकवाहना तसे ।।
विनायका, ईशपुत्रा, सर्वसिद्धिप्रदायका ।
कुमारगुरु हे तुजला, दूर्वा वहाण्यास आणिल्या ।।

स्वीकारा धूपदीपाला, कर्पूरार्ती पवित्र घ्या ।
दक्षिणा, विडा, सुपारीही, फळे नैवेद्य अर्पिला ।।

विघ्नेश्वर, विशालाक्षा, सर्वाभीष्टफलप्रदा ।
प्रदक्षिणा अर्पितो मी, शुभ इच्छा पुऱ्या करा ।।
घडली जन्मान्तरी पापे, या जन्मी मजकडून जी ।
प्रदक्षिणा करी नष्ट पावलापावलात ती ।।

म्हणुनी घालणे एक स्वत:भोवती प्रदक्षिणा ।
नमस्ते विघ्नहर्त्याला, नमस्ते ईप्सितप्रदा ।।
नमस्ते देवदेवेशा, नमस्ते गणनायका ।
साष्टांग घालणे नमन, ऐसे म्हणुन विनायका ।।
मंत्रपुष्प तसा म्हणणे, करणे अंति आरती ।
क्षमायाचना या पुढली, करावी हात जोडुनी ।।

आवाहन न जाणे मी न जाणे स्तवना तव ।
पूजा न जाणतो मी हे ईश्वरा करि क्षमा मज ।।

तुजवीण नसे त्राता, ईश्वरा शरण मी तुला ।
तरी कारुण्यभावाने, रक्षी मजसि ईश्वरा ।।
रात्रंदिन किती करितो अपराध सहस्र मी ।
जाणून मी तुझा दास, क्षमावे मज ईश्वरा ।।
मंत्रहीन, क्रियाहीन, भक्तिहीन, सुरेश्वरा ।
पूजेत जे जसे केले, पूर्णत्वा नेइ ईश्वरा ।।

गेले पाप तसे दु:ख, गेले दारिद्र्य सर्वही ।
आली ही सुखसंपत्ती, तुझिया पुण्यदर्शने ।।
ज्याच्या स्मरण-नामाने, पूजा-यज्ञ-क्रिया तशा ।
न्यून संपूर्ण होती त्या, अच्युता नमु आजला ।।

जसे ज्ञान जसे शक्य, केले उपचार पूजनी ।
सिद्धीविनायकाला ते, प्रिय होवोत सर्वही ।।

आता सांगता सिद्धयर्थ ब्राह्मणपूजना करू ।
वायनेदक्षिणा सोडू, मागू आशीर्वचा तया ।।

झाले पार्थिव गणेशाचे प्रतिवार्षिक पूजन ।
अर्पण असोत सद्ब्रह्मा, ते माझे कर्महीनसो ।।

।। श्रीराम ।। (तीन वेळा म्हणणे.)

आरती म्हणणे.

❊ विसर्जनाच्या वेळी म्हणावयाचे मंत्र ❊

येथून पुढले मंत्र, म्हणणे नच आज ते ।
श्रींच्या विसर्जनावेळी , उपयोगा दिले इथे ।।
नेहमीची करणे पूजा उत्तरपूजा म्हणूनिया ।
अक्षता हाति घेऊनी ,देवांना अंति प्रार्थना ।।
देवांनी घेउनी जाणे पूजा पार्थिव मूर्तिची ।
स्वस्थानी परत आनंदे, पुन्हा आगमना इथे ।।
वाहणे अक्षता देवा मूर्ती किंचित हलविणे ।
मग ती तळेनदी येथे ,विधिपूर्वक विसर्जिणे ।।

।। मंगलमूर्ती मोरया ।।

।। श्रीराम ।।

❊

* ५. मानसपूजा *

१. श्री सद्‌गुरूंची मानसपूजा : भूमिका

ही सद्‌गुरूंची एक वेगळी मानसूपजा आहे. ती कुणा एका विशिष्ट गुरूंनाच लागू आहे असं नाही. कुणा विशिष्ट व्यक्तीनं किंवा विशिष्ट शिष्यानं ती करावी असंही नाही. माणसाच्या जीवनात असलेलं सद्‌गुरूंचं अपार महत्त्व ज्याला जाणवलं आहे, ज्याला सद्‌गुरूंविषयी कृतज्ञता आहे आणि ती कृतज्ञतेची जाणीव सातत्यानं जपावी असं ज्याला वाटतं, त्याला ही मानसपूजा उपयोगी पडू शकेल.

माणसाच्या जीवनात गुरूंचं महत्त्व अपार आहे. साध्या साध्या लौकिक विद्या देणाऱ्या गुरूंचं तर आहेच पण माणसाच्या जीवनाचं सार्थक करणारी आत्मविद्या देणाऱ्या सद्‌गुरूंचं महत्त्व तर अपारच आहे. 'याचि देही याचि डोळा' माणसाला मानसिक पातळीवरची मुक्ती, अखंड आनंद किंवा देवत्व प्राप्त करून घेण्याची विलक्षण क्षमता निसर्गानं दिलेली आहे. त्यासाठी लागणारं आवश्यक बहिरंग आणि अत्यंत अद्‌भुत असं अंतरंग निसर्गानं माणसाला बहाल केलेलं आहे. त्याच्या साहाय्यानं 'नराचा नारायण' होणं हे तसं खरं सोपं वाटणारं काम आहे, पण प्रत्यक्षात मात्र ते कठीण बनतं हे खरं. कारण अशी मुक्त माणसं, देवमाणसं प्रमाणानं किती कमी आढळतात, त्यावरून हे कळू शकतं.अशा वेळी हे ध्येय कळायला, ते गाठायला माणसाला मदत करणाऱ्या सद्‌गुरूंचं महत्त्व किती मोठं आहे, हे आणखीच लक्षात येतं.

वास्तविक, हे आनंदप्राप्तीचं ध्येय तसं सोपं वाटतं पण त्याला दोन मुख्य अडचणी दिसून येतील. एक तर माणसाला अखंड आनंद, शाश्वत आनंद, देवपण याची कल्पनाच अनेकदा येत नाही. त्याला ओळख असते ती तात्पुरत्या, नश्वर देहसुखाचीच. आणि दुसरी महत्त्वाची अडचण माणसाच्या स्वत:च्याच

काही समजुतींची–मतांची–संस्कारांची. त्याला स्वत:लाच असं वाटतं की माणूस म्हटला की तो दु:खी असायचाच, असं देवपण किंवा अखंड आनंद वगैरे काही नसतंच ! सगळं जग स्वार्थी आहे, जगात आपली काळजी घेणारं, आपल्या कल्याणाची चिंता वाहणारं कुणीच नाही, चांगुलपणानं राहायचे दिवस नाहीत अशा त्याच्या अनेक ठाम समजुतीच त्याला संकुचित आणि अधिकच स्वार्थी बनवतात. यातूनच त्याच्या वाट्याला अखंड आनंदाऐवजी दु:ख, निराशा आणि सततची काळजी, भय असल्या गोष्टी येतात, हा सारा अज्ञानाचा परिणाम होय.

आणि नेमका इथंच सद्‌गुरूंचा माणसाला उपयोग होतो. ते त्याला जागं करतात, तू कोण आहेस, कोण होऊ शकतोस याची कल्पना आणून देतात, देवत्वाचा, आनंदाचा, कल्याणाचा मार्ग दाखवतात. एवढंच नव्हे तर देवत्वाचा हा प्रवास करू इच्छिणाऱ्याला त्याचा मुक्काम गाठून देईपर्यंत मार्गदर्शन आणि सोबत जन्मोजन्मी करतात. अशा खऱ्या उपकारकर्त्या सद्‌गुरूंविषयी माणसाला अत्यंत कृतज्ञता वाटणं अगदी स्वाभाविक आहे. अशी कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक मार्ग म्हणजे ही मानसपूजा होय.

व्यावहारिकदृष्ट्या पूजा करायची तर ते गुरू प्रत्यक्ष देहानं असणं, त्यांची तशी पूजा स्वीकारायला संमती असणं, अनेक उपचार करण्याची आपली सर्वप्रकारची तयारी असणं अशा अनेक अडचणी असू शकतात. त्या साऱ्यावर उत्तम उपाय म्हणजे त्यांची मानसपूजा करणं, तेच या पूजेच्या निमित्तानं साध्य करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

म्हणूनच या मानसपूजेमध्ये अज्ञानी जिवावर गुरूंनी, त्याला जागं करण्यापासून केलेल्या उपकारांचं, प्रथम स्मरण केलं आहे. माणसाचा विस्मरणाचा स्वभाव पाहिला तर असं स्मरण नित्य करण्याची गरज सहजच लक्षात येऊ शकेल. त्यानंतर या मानसपूजेमध्ये प्रत्यक्ष पूजेतल्या व्यावहारिक अडीअडचणी लक्षात घेऊन, त्यांना पर्याय म्हणून हा मानसपूजेचा संकल्प केल्याचं म्हटलं आहे. प्रत्यक्ष पूजेला तर हा पर्याय आहेच, पण तो तसा एका अर्थानं अधिक चांगला पर्यायही आहे, हे जाणून घेतलं तर बरं होईल.

माणसालाच ही मोठी क्षमता आहे की त्याचं अंतरंग मोठं सामर्थ्यवान आहे. माणूस कल्पनेनं सारं जग उभं करू शकतो, त्यात जगू शकतो, ते जग

नाहीसं करू शकतो. हा सारा नुसता कल्पनेचा खेळ नसतो तर त्याच्या प्रत्यक्ष आयुष्यात घडणाऱ्या घटनांची, त्यांच्या कृतींची खरी प्रेरणा, त्यांची खरी सुरुवात त्याच्या अंतरंगातल्या या विचार–कल्पना–निर्णय अशा घडामोडींनीच होत असते. त्यामुळंच माणसातला खरा बदल हा त्याच्या अंतरंगातला बदल असं मानलं जातं आणि ते अगदी सत्य आहे. याच अर्थानं बाह्य पूजेचं महत्त्व कमी नसलं तरी त्याहीपेक्षा मानसपूजा ही अधिक चांगली, प्रभावी आणि गरजेची का आहे हे स्पष्ट होऊ शकेल.

त्यातही ही मानसपूजा सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणं थोडी आणखीनच वेगळी आहे. ते वेगळेपण असं की एरवीच्या मानसपूजेमधले उपचार हे नेहमीच्या बाह्य पूजेसारखेच असतात – स्नान, चंदन, गंधपुष्प असे ! मानसपूजेमध्ये फक्त ते मनानं करायचे असतात. पण ही सद्‌गुरूंची 'खरी मानसपूजा' होईल का, हा विचार आपणच मनाशी केलेला बरा.

सद्‌गुरूंचं खरं कार्य हे आपल्याला जागं करणं, सावध करणं, योग्य मार्ग दाखवणं, आपल्याला वेळोवेळी सांभाळून घेणं, आपल्याला प्रगतीसाठी नामासारखं साधन देणं, आपल्याकडून ते करवून घेणं, आपल्या मनाच्या स्वार्थ–अहंकार अशा प्रेरणांना आवर घालायला आपल्याला प्रवृत्त करणं, आपल्याकडून खरी सत्कर्मं निष्कामपणे घडवून घेणं – असं आहे. मग सद्‌गुरूंची खरी पूजा म्हणजे त्यांच्या या साऱ्या उपदेशाचा मनावर सततचा, ताजा संस्कार टिकवणं आणि त्यानुसार कृतींचा सततचा प्रयत्न करणं ही होय. म्हणून खरी मानसपूजा ही अशा तऱ्हेच्या सद्‌गुरूंना अभिप्रेत असलेल्या आपल्या वृत्तींच्या, कृतींच्या रूपानं करणंच खरं सयुक्तिक ठरेल. ते घडावं म्हणून आपल्या मनावर त्यांना अपेक्षित असलेल्या संस्कारांचा ठसा रोज उठवण्याचा प्रयत्न या मानसपूजेतल्या उपचारांच्या निमित्तानं घडला आहे. म्हणून या मानसपूजेत लौकिक पूजेतले शब्द साध्या पूजेतल्या सारखेच असले, तरी त्या शब्दांच्या रूपानं अभिप्रेत असणारे उपचार मात्र आपल्या स्वत:च्या आचरणाचे, आदर्श कृतींचे, आदर्श वृत्तींचे आहेत. अशा वृत्तींची, कृतींची आठवण आपल्याला प्रत्येक वेळी ही मानसपूजा करताना सहजच घडेल. सद्‌गुरूंच्या त्या त्या बाबतीतल्या उपदेशाचा आपल्या मनावरचा ठसा पुन्हा ताजा होईल आणि आपल्या कृतींना तोच ठसा विधायक

दिशा देऊ शकेल.

या मानसपूजेत सद्‌गुरूंच्या कृपेचं स्मरण प्रथम घडतं. या पूजेची पार्श्वभूमी तयार होते आणि गुरूंना येण्यासाठी आवाहन करून प्रत्यक्ष पूजेला आरंभ होतो. त्यात सद्‌गुरूंना आवाहन आहे, तेसुद्धा आपल्या मनात येण्यासाठी, उतरण्यासाठी, थांबण्यासाठी. त्याची पूजेसाठीच नव्हे तर आपल्या जीवनाला योग्य दिशा राहाण्यासाठी आत्यंतिक गरज आहे. कारण गुरू आणि त्यांच्या रूपानं भगवंत आपल्या मनात सतत जागा राहिला, तर आपल्या कृती 'पशुकृती' होणार नाहीत, त्या मानवकृती होतील. इतकंच काय, पण त्या 'देवकृती'सुद्धा होतील. तसं व्हावं या तळमळीमुळं इथं सद्‌गुरूंना परमप्रेमानं, आदरानं आपल्या हृदयात येण्यासाठी आवाहन तर केलंच आहे, पण एरवीच्या पूजेप्रमाणं अखेरीस विसर्जन न होता सद्‌गुरूंना त्यांनी आपल्या हृदयात कायमचं राहावं अशी प्रार्थना केली आहे.

आधी स्पष्ट केल्याप्रमाणं या पूजेतले प्रारंभिक उपचारही थोडे वेगळे आहेत. उदाहरणानंच पाहायचं झालं तर एखाद्या पाहुण्यांना ज्या वेळेला आपण घरी बोलवतो त्यावेळी त्यांच्यासाठी आपण दारात सडारांगोळी घालतो, पायघड्या पसरतो. एरवी आपण मानसपूजेमध्ये मनानं दारात घागरीनं पाणी नेऊन सडा घातला असता, पायघड्या उलगडून घातल्या असत्या,दारात सनईचौघडा लावला असता, पण या वेगळ्या पूजेमध्ये हेच उपचार माझ्या आचरणाचे, वृत्तीचे, भावनांचे करायचे आहेत. पाणी टाकून सडा घालणं हे एक वेळ सोपं आहे, पण इथं कृतज्ञतेचा सडा अभिप्रेत आहे. आपल्या साऱ्या वर्तनातून आपल्याला गुरूंबद्दल वाटणारी कृतज्ञता प्रतिबिंबित व्हावी, असं इथं अभिप्रेत आहे. तीच गोष्ट पायघड्यांची आहे, सनईचौघड्याची आहे. आपल्या मनात गुरूंच्याबद्दल असलेला आदर आपण पायघड्यांच्या रूपानं त्यांच्या पायाशी पसरावा, आपला सनईचौघडासुद्धा आपल्याला गुरूंच्या आगमनाची जी आत्यंतिक उत्सुकता आहे ती व्यक्त करणारा असावा. व्यवहारामध्ये विचार केला, तर चौघडा हा अव्यक्त असलेला शब्द–ध्वनी–ताल व्यक्त करतो, तसं आपली गुरूंच्या येण्याविषयीची उत्सुकता–देखावा किंवा विषय करण्याच्या हेतूनं नव्हे, तर ती उत्सुकता आत न राहून आपल्या बोलण्यात वा कृतीत दिसावी.

आपल्या या मानसपूजेमध्ये जरी ती मनात व्हायची असली आणि ती मनात करण्याचा आपला स्वत:चाच विचार असला तरी त्याला अडथळा आपल्या मनाचाच होऊ शकतो, हे लक्षात घेण्यासारखं आहे. एखाद्याला आपण घरी राहायला बोलावलं तर आपल्या घरचं वातावरण तो पाहातो. ते जर त्याच्या इच्छेनुरूप असलं तर तो तिथं यायला आणि राहायला तयार होतो. गुरू किंवा भगवंत मनात येऊन राहायला आपल्या मनातलं वातावरण आपण त्यांच्या इच्छेनुरूप करणं हे आपलं काम आहे, हे ओघानंच आलं. ते तसं त्यांच्या इच्छेनुरूप करायला आपली इच्छा नाहीशी केली पाहिजे. म्हणजेच माझ्या मनाचे माझ्या इच्छेप्रमाणं होणारे संकल्प–विकल्प नाहीसे करायला हवे. म्हणून मनाच्या दाराच्या आत त्यांना घेतानाच ही माझ्या स्वत:च्या संकल्पविकल्पांची–हवेनकोपणाची दारं आपण सताड उघडी टाकावी म्हणजे क्षणभर असा विचार करू की सद्गुरूंना आवाहन करून त्यांना आपल्या मनात रहा म्हटल्यानंतर, आपल्या जीवनात ज्या ज्या घटना घडतात त्या त्या माझ्या मनाप्रमाणं किंवा मनाविरुद्ध असा विचारही मनात आणू न देता केवळ त्यांच्याच इच्छेप्रमाणं आणि संकल्पाप्रमाणं मी जगतो आहे अशी मनाची धारणा रोज ठेवायची आहे. हे काम बोलतो आहोत एवढं नक्कीच सोपं नाही, म्हणूनच त्यात म्हटलं आहे की 'संकल्पविकल्पांची दारे। उघडिली मिया निधरि' हा निर्धार फारच गरजेचा आहे. हे सगळं समजून उमजूनही क्षणात इकडंतिकडं भरकटणाऱ्या मनाला पुन्हा भगवंताच्या इच्छेचं भान आणून द्यायला हा निर्धार अतिशय गरजेचा आहे. तो निर्धार आपण जोपासू शकलो, तर मात्र मनमंदिरात अन् हृदयाच्या गाभाऱ्यात 'भगवदिच्छेचे वारे' मोकळेपणानं खेळल्याचा अनुभव येईल.

सद्गुरूंना आपल्याकडे नुसतं बोलावून, त्यांनाही आपल्याकडं यावंसं वाटून ते पुरेसं ठरत नाही. म्हणूनच अनेकांना गुरू करूनही उपयोग होत नाही, अनुभव येत नाही असं का व्हावं, याचं खरं कारण आपण त्याची खरी कारणं समजून घेत नाही, यात आहे. ज्याची आपल्यावर खरोखरीची निष्ठा आहे, त्याच्याकडं थांबायला, यायला त्यांना अवघड कसं वाटेल? त्यांना ते प्रत्यक्षात अवघड वाटतं याचं खरं कारण आपली निष्ठा, आपलं आज्ञापालन खरं नसतं. म्हणून त्यांना बसायला आपल्या अढळ निष्ठेचं सिंहासन ठेवणं हेच उचित ठरेल,

त्यातही त्या सिंहासनावर गुरूंना बसायला आज्ञापालनाचं आसन घालणं, हेच आदर्श ठरेल. कारण अनेक लोक निष्ठा ठेवतात पण गुरुआज्ञा पाळीत नाहीत, त्यांनी सांगितल्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न करीत नाहीत, त्यातून आज्ञा पाळलीच तर ती आज्ञा स्वत:च्या सोयीनुसार, स्वत:ला हवी असलेली होती म्हणून ती पाळणारेच भेटतील. हे अर्थातच योग्य नाही. त्याऐवजी आपण त्यांच्या आज्ञेचं पालन जर पूर्णत: करायचा प्रयत्न केला तर ते गुरूंना आपल्या मनामध्ये नक्की स्थिर करील आणि मग गुरूंचा अनुभवही येईल.

जी गोष्ट आसनाची आहे तीच पुढं पाणी, अर्घ्य, पंचामृत, स्नान, चंदन, फुलं, धूप, दीप, निरांजन यांचीही आहे. लौकिकदृष्ट्या या साऱ्या वस्तू आपल्या मिटलेल्या डोळ्यांसमोर खचितच आणि पटकन् उभ्या राहू शकतील. त्या अर्पण करणंही तसं सोपं आहे. पण त्यांच्या कृपेचं सतत स्मरण ठेवणं हेच जर पाणी म्हणून वापरायचं असेल किंवा ज्या देहभावामुळं, देहबुद्धीमुळं आपल्याला दु:ख भोगावं लागतं आहे, जो देहभाव आपण सोडावा असं आपल्या सद्गुरूंना सारखं वाटतं, त्या देहबुद्धीचाच अर्घ्य आपल्याला द्यायचा असेल तर मात्र हा उपचार आपल्याला विचार करायला लावील. हा अर्घ्य सोपा नसू द्या पण मनात देहबुद्धी सोडण्याचे प्रयत्न तरी हा अर्घ्य सुरू करील.

गुरूंना खरी आवडतात ती आपली सत्कर्मं ! भगवंताच्या इच्छेनं वाट्याला आलेली आणि म्हणून कर्तव्यरूप म्हणून केलेली सत्कर्मं ! आणि इतकंच नाही तर, अत्यंत मनापासून ती आचरून, पूर्ण करून पुन्हा ती सारी कृष्णार्पण करून त्यातून बाजूला होण्याची आपली वृत्ती. अशा सत्कर्माचरणानं त्यांना आपल्याबद्दल, शिष्याबद्दल जशी स्नानानं शरीरशुद्धी व्हावी, पवित्र वाटावं तसा आनंद होतो. म्हणूनच इथं 'सत्कर्मांचे पंचामृत स्नान । घालावया अधीर मन । कर्मकृष्णार्पणाचे शुद्धोदक स्नान । पूर्णोपचार व्हावया' असं म्हटलं आहे.

आपल्या सध्याच्या वाणीचा वापर एकतर स्वार्थासाठी किंवा दुसऱ्यांचे, परिस्थितीचे दोष किंवा उणिवा दाखवण्यासाठी होतो, असं आपल्या लक्षात येईल. ज्या वाणीनं आपण हे एकप्रकारे निषिद्ध काम करतो आहोत, त्याच वाणीनं जर आपण सद्गुरूंचं आणि भगवंताचं नाम घेणार असू तर त्या नामाला दोष लागल्याशिवाय कसा राहील? उलट जो आपली वाणी तर पवित्र राखीलच,

पण शक्य तोवर तिचा वापर दुसऱ्याच्या हितासाठी, त्यांचा चांगुलपणा, त्यांचे आदर्श वर्णन करण्यासाठी करील, त्याची वाणी विमल ठरेल आणि ती वाणी सद्‌गुरूंनाच नव्हे, तर संपर्कात येणाऱ्या इतरांनासुद्धा चंदनाच्या सुगंधाप्रमाणं आनंदित करील, यात नवल ते काय?

आपल्या साध्या वस्त्रामध्ये जसे उभे आडवे धागे असतात, तसेच आपल्या जीवनातही श्वास आणि नि:श्वासाचे धागे असतात, ते सारे श्वासनि:श्वास जर आपण सद्‌गुरूंच्या स्मरणाला अर्पण करू तर ते वस्त्र त्यांना आवडेल हे काय सांगायला हवं? आपल्या मनात वेळोवेळी भावांचे तरंग सतत उमटत असतात. आपण ज्या वेळी दुसऱ्यांविषयी असूया, अप्रीती, तिरस्कार असले भाव बाळगतो, त्या वेळी आपण कोणत्या भावांची फुलं आपल्या सद्‌गुरूंना अर्पण करीत असतो, याविषयी सावध राहावं. म्हणून इथं म्हटलं आहे की 'सद्‌भावांची पुष्पे वेचून । सादर करितो गुरुराया । '

पूजेच्या उपचारात जेव्हा धुपारतीत निखाऱ्यावर आपण धूप घालतो, तेव्हा त्या प्रखर आगीत तो जसा जळत जाईल, तसा सुगंध दरवळतो. या वेगळ्या मानसपूजेमध्ये दिवसभरात किंवा मधल्या काळात कधीकधी, कशाकशाबद्दल आपल्याला 'मी'पणा वाटला, तर तो हुडकून त्या मीपणाचे धूपखडे वेचून गुरूंसमोर ठेवावेत! पण हे म्हटलं तरी करायला मनाला थोडंतरी वैराग्य लागतंच. म्हणून या पूजेतले निखारे वैराग्याचेच आहेत. वैराग्याच्या आगीतच मीपणाचा धूपखडा जळू शकतो. पण तो जर एकदा जळला तर त्यातून म्हणजेच 'मी'पणासारख्या त्याज्य गोष्टींतूनसुद्धा 'तुमचेपणा'चा म्हणजेच आत केवळ गुरूंची किंवा भगवंताचीच इच्छा राहिल्यानं त्याचाच सुगंध दरवळतो.

अनुसंधान हे तर साऱ्या परमार्थाचं सारच म्हणावं लागेल. ज्याला भगवंताचं किंवा गुरूंचं सतत अनुसंधान म्हणजे आठवण किंवा त्यांच्या आठवणीत कर्तव्य करण्याची विद्या जमेल, त्याच्याठायी गुरू तर विद्यमान राहतीलच पण ते या अनुसंधानाच्या निरांजनाच्या प्रकाशात सतत प्रकाशमान होतील, राहतील. अनुसंधान टिकवण्याचे आपण आटोकाट प्रयत्न करायला हवेत, हे तर खरंच. पण खरं अनुसंधान टिकेल ते प्रयत्नांती त्यांनी केलेल्या अनुग्रहानं–कृपेनंच टिकेल.

नैवेद्याच्या उपचाराची अवस्था तीच आहे. नेहमीच्या पद्धतीनं चार चांगले

पदार्थ करून नैवेद्य दाखवणं ठीकच आहे. पण गुरूंना खरा आवडणारा नैवेद्य 'नामाचाच'. तोही पुन्हा अत्यंत मनापासून, अत्यंत प्रेमानं घेतलेल्या नामाचा – म्हणून असाच नैवेद्य वाढण्याची आपण आकांक्षा का करू नये? 'नामनैवेद्य वाढिला। प्रेमपाण्याने अर्पिला' अशाच खऱ्या उपचाराची मनाला रोज आठवण करावी. शेवटी मनुष्य काही पैशाच्या रूपानं दक्षिणा ठेवतो पण, मानसपूजेमध्ये पैशाचा आणि अन्य कुठल्याही तत्सम वस्तूंचा आपल्याला सतत वाटणारा आणि आपल्या प्रगतीला आड येणारा लोभच मनापासून, म्हणजे भिजवून, दक्षिणा म्हणून गुरूंसमोर ठेवावा आणि अखेर काही कमी पडलं असेल तर त्याबद्दल मन:पूर्वक सद्गुरूंची क्षमा मागावी, हे उचितच होईल.

हे उघडच आहे की, हे सारे उपचार मनानं करताना लौकिक वस्तूंचं स्वरूप त्याला नसल्यानं ते करणं किंवा केल्याची कल्पना करणं थोडं अवघड आहे. त्यामानानं दृश्यातली एखादी वस्तू आणणं आणि अर्पण करणं खूपच सोपं वाटेल. पण अशा वस्तू आणून आणि अर्पण करूनसुद्धा आपण पूर्वी आहोत तसेच स्वार्थी, अहंकारी, चिंताग्रस्त, दु:खी राहातो हा आपला अनुभव नाही का? त्याचाच खेद खऱ्या सद्गुरूंना नेहमी होत असतो. म्हणून अशा दृश्य वस्तू आणि त्यांचे उपचार टाळण्याचा इथं प्रयत्न आपण करतो आहोत आणि या साऱ्या वस्तूंच्याऐवजी त्यांच्या निमित्तानं आपल्या वृत्ती आणि कृती आपण समोर आणतो आहोत. त्यामुळं एका बाजूनं स्वत:ला बदलायला या पूजेचा उपयोग होईल आणि आपल्यातल्या विधायक संकल्पामुळं आणि बदलामुळं सद्गुरूंनाही ही पूजा 'खरी पूजा' वाटेल आणि आवडेलही. या साऱ्या उपचारांच्या निमित्तानं रोज आपल्या आचरणाचं, प्रगतीचं परीक्षणही आपोआपच घडतं. म्हणूनच 'जे जे आदरे कल्पिले। उपचारी मने अर्पिले। मम जीवनी उतरो तेतुले। कृपाप्रसादे गुरुराया।' ही प्रार्थना रोज या मानसपूजेमध्ये अखेरीस केली आहे.

शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं की, आपल्या खऱ्या कल्याणासाठी अनुकूल आणि सद्गुरूंना अभिप्रेत असलेलं आपलं जीवन घडवण्याचा प्रयत्न या मानसपूजेच्या निमित्तानं आपण आर्ततेनं, सातत्यानं करीत राहिलो तर या पूजेत सुरुवातीला अपेक्षा केल्याप्रमाणं अखंड आनंदाचा, देवत्वाचा अनुभव आपल्याला याच जीवनात आल्याखेरीज राहणार नाही. आणि आपण हा अनुभव 'याचि देही

याचि डोळा' घ्यावा यासारखी आनंदाची गोष्ट सद्‌गुरूंना तरी दुसरी कुठली असेल?
आणि हेच या 'सद्‌गुरूंच्या मानसपूजे'चं खरं फलित ठरेल !

***

१. श्री सद्‌गुरूंची मानसपूजा

नमन श्री गजवदना
माझिया मानसपूजना

यावे मम हृदयसदना
निर्विघ्न करावे गणराया।।१।।

जगी उगवता दिनकर
तैसा आपुला वरदकर

सकळांसि वाटे आधार
असता धीर वाटतसे ।।२।।

माझिया पूजेचे प्रयोजन
कृपेचे घडो चिंतन

सद्‌गुरूंचे व्हावे स्मरण
अखंड टिको अनुसंधान ।।३।।

जीवपणी जन्मासि आलो
आनंदाचे निजघर विसरलो

मी माझे करिता रमलो
कधी कैचे कळेना ।।४।।

म्हणुनी दु:खी जाहलो
अज्ञानअंधारी बुडालो

चिंता नैराश्ये ग्रासलो
बेसावध होऊनी ।।५।।

तेव्हा श्री सद्‌गुरुरायासी
जागवुनी विचारी मजसी

कळवळा उपजला मानसी
वाया का भ्रमसी ।।६।।

जागे होता जाते स्वप्न
दु:ख चिंता अज्ञान

क्षणी पाहता नष्ट होऊन
नाहीसे केले झडकरी ।।७।।

आभाळाएवढे उपकार
देवचि झाले साकार

सद्‌गुरूंचे निरंतर
दीनजीवा उद्धरावया ।।८।।

त्या सद्‌गुरूंचे टिकविण्या स्मरण
सुलभ सोपे साधन

बाह्य पूजेचे नाना विधी
मानसपूजेने उपाधी

म्हणोनी मानसपूजेचा संकल्प
सर्वभाव करूनी एक

गुरूंच्या गुरुवरा श्री दत्तगुरू
सप्रेम स्वीकारावया उपचारू

कृतज्ञतेचा सडा घालुनी
उत्सुकतेचा चौघडा लावुनी

संकल्पविकल्पांची दारे
भगवदिच्छेचे वारे

यावे यावे श्री गुरुराया
अतर्क्य तुम्ही किमया

निष्ठेचे ठेविले सिंहासन
आनंदे बैसावे आपण

कृपा स्मरणाचे जळ
देहभावाचा अर्घ्य निर्मळ

सत्कर्मांचे पंचामृतस्नान
कर्मकृष्णार्पणाचे शुद्धोदक स्नान

मांडिले हे मानसपूजन
उपाधिविरहित ।।९।।

अनंत बंधने देहादि
अवघीची निरसिली ।।१०।।

तळमळीचे घेऊनी उदक
आर्ततेने सोडिला ।।११।।

धाडून द्यावे आमुचे सद्‌गुरू
या मानसपूजेचे ।।१२।।

आदराच्या पायघड्या पसरुनी
प्रतीक्षा मी करितसे ।।१३।।

उघडिली मिया निधरि
हृदयमंदिरी खेळतसे ।।१४।।

प्रवेशुनी हृदयी माझिया
साकार झाला गुरुपदाची ।।१५।।

वरी आज्ञापालनाचे आसन
मानसपूजन स्वीकारावया ।।१६।।

चरण प्रक्षाळण्या कोमळ
विनीत भावे अर्पीतसे ।।१७।।

घालावया अधीर मन
पूर्णोपचार व्हावया ।।१८।।

विमलवाणीचे चंदन
सद्भावांची पुष्पे वेचून
श्वासनि:श्वासाचे वस्त्र अर्पून
सादर करितो गुरुराया ।।१९।।

मीपणाचे धूपखडे वेचिले
तुमचेपणाचे सुगंध दरवळले
वैराग्यनिखारी घातले
गाभारी मनाच्या गुरुराया।।२०।।

अनुसंधानाची निरांजने
सदा तेवती आर्ततेने
चेतविली अनुग्रहज्योतीने
प्रसन्न गुरुमुख पाहावया।।२१।।

नामनैवेद्य वाढिला
लोभ भिजवूनी ठेविला
प्रेमपाण्याने अर्पिला
दक्षिणा म्हणोनी गुरुराया।।२२।।

क्षमायाचनेची अक्षता
मम हृदयी विश्रांती आता
न्यूनाधिकाची करो पूर्तता
सदैव घ्यावी गुरुराया ।।२३।।

जे जे आदरे कल्पिले
मम जीवनी उतरो तेतुले
उपचारी मने अर्पिले
कृपाप्रसादे गुरुराया ।।२४।।

तुमचिया कृपे लाभला दिवस
दीनभक्ताचा मानस
सद्गुरुपूजा घडली खास
मानसी परिपूर्ण जाहला ।।२५।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

*

२. श्रींची एकश्लोकी मानसपूजा

(वरील मानसपूजा सर्व सद्‌गुरूंना लागू असून वेळ असल्यास व शक्य असल्यास ती म्हणावी किंवा वेळ कमी असल्यास श्रींच्या संबंधी ही एकश्लोकी मानसपूजा म्हणावी. पूर्ण मानसपूजा आठवड्यातून निदान एकदा तरी सवडीनुसार म्हणावी.)

राही मी जरि दूर आज तरिही आलो मनाने इथे ।
गोंदवल्यास पवित्र भूमिवरती श्रींची समाधी जिथे ।।
येथे शांत, प्रसन्न चित्त करुनी मी घेतसे दर्शना ।
नामी रंगुन बोध नित्य जगु दे, महाराज, ही प्रार्थना।।

*

३. सर्वांसाठी सोपी पर्यायी मानसपूजा

वरील मानसपूजेचे विवरण व त्यानुसार पुढे दिलेली मानसपूजा ही अभ्यास व वृत्त्यंतरास उपयोगी असली तरी सर्वसामान्य साधकांना त्यात नेहमीचे पूजेचे उपचार नसल्यामुळे थोडी अडचण येऊ शकते. त्यासाठी अत्यंत छोट्या व सुटसुटीत स्वरूपात एक मानसपूजा येथे केली जाते. मानसपूजा म्हणजे आपापल्या सद्‌गुरूंची किंवा दैवताची मानसिक पातळीवर भेट घेणे होय. हे लक्षात घेऊन तसेच उपलब्ध असलेला कमी वेळ लक्षात घेऊन सद्‌गुरूंची प्रतिमा, समाधी, फोटो, मनाने समोर आणून पायांवर एखादे फूल भक्तिभावाने वाहून मन:पूर्वक नमस्कार करणे, प्रार्थना करणे व त्यांचे स्मरण आपल्याला दिवसभर टिकावे अशी आर्ततेने विनंती करणे एवढी छोटी मानसपूजाही येथे सुचविली जाते. आपल्याला विशेष वाटणाऱ्या आनंदाच्या, दु:खाच्या, तणावाच्या घटना कानावर घालण्यासाठीही या मानसपूजेतली भेट उपयोगी ठरू शकते.

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

मजपाशी नाही काही ।
एक भाव आणिला पाही ।।